# CORONA 2019 लॉकडाऊन कालावधीमधील कृषि पणन मंडळाचे विशेष कामकाज

अॅग्रोवन

## राज्यातील २२० बाजार समित्यांचे कामकाज सुरळीतः सुनिल पवार



पुणे (प्रतिनिधी) : कोरोना विषाणूमुळे सुरू असलेल्या लॉकडाऊनमध्ये राज्यातील फळे भाजीपाल्याचा पुरवठा सुरळीत राहण्यासाठी राज्यातील ३०७ बाजार समित्यांपैकी २२० बाजार समित्यांमधून कामकाज सुरू असून, कमीत कमी गर्दीमध्ये बाजार सुरू ठेवण्याचे व्यवस्थापन केले आहे, अशी माहिती पणन संचालक सुनील पवार यांनी दिली.

याबाबत पवार म्हणाले, "लॉकडाऊनमध्ये राज्यातील फळे भाजीपाल्याची विस्कळीत झालेली पुरवठा साखळी पूर्ववत झाली आहे. यासाठी पणन, कृषी आणि पोलीस प्रशासनाच्या समन्वयाने काम सुरू झाले आहे. बाजार समित्यांमधून तसेच थेट पणनद्वारे भाजीपाला पुरवठा सुरळीत झाला आहे. पुणे, नाशिक आणि मुंबई महानगरपालिकांनी देखील पुढाकार घेतला असून, शहरांमध्ये विविध ठिकाणी भाजीपाला विक्री केंद्रे शेतकरी उत्पादक कंपन्या, शेतकरी गटांद्वारे सुरू केला आहे. तर अनेक गटांनी विविध गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये थेट विक्री सुरू केली आहे. या विविध उपाययोजनांमधून शहरांमधील पुरवठा साखळी पूर्ववत झाली आहे. यामुळे ग्राहकांना फळे-भाजीपाला, किराणा मिळणार आहे, त्यांनी कसलाही साठा करू नये."

### परवान्याचा सकारात्मक उपयोग करा

बाजार समित्या सुरू करण्यासाठी केंद्र सरकारने साथ रोग पसरू नये यासाठीच्या विविध १२ उपाय आणि खबरदारी घेण्याचे सांगितले आहे. त्यानुसार बाजार समित्यांचे कामकाज सुरू आहे. याची जबाबदारी जिल्हा उपनिबंधकांवर देण्यात आलेली आहे. तसेच थेट पणन परवानाधारकांनी देखील आपल्याला दिलेल्या परवान्याचा सकारात्मक उपयोग सध्याच्या आणीबाणीच्या आणि आपत्कालीन परिस्थितीमध्ये करण्याचे देखील आवाहन श्री. पवार यांनी केले आहे.

Pune, Main
31/03/2020 Page No. 4

# गर्दी टाळत बाजार समिती सुरु ठेवण्याचा 'पुणे पॅटर्न'

[illegible]

### अशी होती अंमलबजावणी

[illegible]

# पुण्यात फळे आणि कांदा, बटाट्याचे व्यवहार सुरळीत

[illegible]

### फुल बाजार १५ एप्रिल पर्यंत बंदच

[illegible]

लोकमत

# कांद्याची उपलब्धता ऑनलाइन कळणार

## चंद्रशेखर बारी : पणन मंडळाच्या संकेतस्थळावर माहिती

लोकमत न्यूज नेटवर्क

**लासलगाव :** संपूर्ण भारतभर कोरोनामुळे विविध राज्यात शेतीमालाचा तुटवडा होऊ नये व रास्त दरात सामान्य जनतेला जीवनावश्यक वस्तू मिळाव्यात याकरीता बाजार व्यवस्था व मालवाहतूक व्यवस्थेवर काही अंशी मर्यादा आल्या आहेत. मात्र आता नाशिक जिल्ह्यात कांदा या शेतीमालाची देशभरात उपलब्धता व शासन स्तरावर कोणत्या ठिकाणी व्यापारी अगर थेट शेतकरी तसेच शेतकरी उत्पादकांच्या संस्था सांघिक सहकारी व्यवस्थेकडे किती प्रमाणात कांदा माल विक्रीस उपलब्ध आहे याची ऑनलाईन माहिती तयार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य पणन मंडळाचे पुणे येथील सरव्यवस्थापक सुनील पवार व नाशिक येथील पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक चंद्रशेखर बारी यांनी दिली आहे.

महाराष्ट्रात व विशेषत: नाशिक जिल्हा पुणे अहमदनगर , जळगाव , धुळे व सोलापूर या जिल्ह्यात कांदा उत्पादन व बाजार समितीत विक्री होते. परंतु मजुरा अभावी बाजार समितीच्या लिलावावर काही मर्यादा आलेल्या आहेत.

त्यामुळे देशभरात कांदा माल उपलब्धता व व्यवहार खरेदीदार व विक्रेता यात थेट फोनने अगर ऑनलाईन पध्दतीने होऊन विक्री नंतर हा शेतीमाल खरेदी झालेल्या शहरात पोहोचविण्याकरीता लागणारी मालवाहतूक अगर अधिक माल असेल तर थेट रेल्वेने रॅकची व्यवस्था करून पोहाचवण्यासाठी तसेच यावर नियंत्रण ठेवण्यासाठी वरिष्ठ अधिकारी मदत व सहकार्य करणार आहेत. शेतीमालाची विक्री अवघ्या भारतभर झाली तर या स्थितीत कांदा व शेतीमालाला चांगले दर मिळावे व मालाची पाठवणी व्हावी, त्याचबरोबर तातडीने नागरी वस्तीत लागणारा शेतीमाल उपलब्ध व्हावा याकरीता संपूर्ण देशात व विविध राज्यात शेतीमाल उपलब्धता यादी तात्पुरती तयार करण्यात आली असल्याचे चंद्रशेखर बारी यांनी सांगीतले. व्यापारी व शेतकरी तसेच शेतीपुरक संस्थेच्या नावाची व मालाची उपलब्धता याबाबतची माहिती शासनाच्या महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ वेबसाईटवर उपलब्ध असुन याचा वापर करून खरेदी विक्री करावी व काही मालखरेदी व पाठवण्यासाठी काही समस्या निर्माण झाली तर संपर्क साधावा असे आवाहनही करण्यात आले आहे.

> “ कोरोनाने अवघ्या भारतभर लॉकडाऊनमुळे विविध भागात उत्पादीत झालेला शेतीमाल विविध राज्यात उपलब्ध होत नाही. नागरिकांना टंचाई जाणवू नये या करीता केंद्र सरकारने विविध राज्यात उत्पादकांच्या व शेतीमालाची खरेदी- विक्री करणारे व्यापारी व विविध सहकारी संस्था यांच्याकडे कोणत्या मालाची उपलब्धता आहे व तो खरेदीकरीता कसा उपलब्ध होईल यासाठी समांतर पर्यायी माहिती तयार होण्यासाठी यादी तयार केली आहे. यावर विविध राज्यातील वरीष्ठ अधिकारी नियंत्रण व समन्वयाची भुमिका बजावणार आहेत.
>
> \- **सुनील पवार** , सरव्यवस्थापक महाराष्ट्र राज्य पणन मंडळ, पुणे

Nashik Main
Page No. 2 Apr 03, 2020
Powered by: erelego.com

पुढारी

# मुंबईकरांना आता मुबलक भाजीपाला

## पणन संचालकांकडून भाजीपाल्यांच्या गाड्यांना थेट मुंबईत प्रवेश

**नवी मुंबई: पुढारी वृत्तसेवा**

मुंबईतील जीवनाश्यक वस्तूंची कमतरता भसू नये, यासाठी शेतमालाच्या वाहनांना चेकनाक्यावरुन थेट मुंबईसह उपनगरात प्रवेश दिला जात आहे. गुरुवारी सकाळी २२० भाजीच्या गाड्या मुलुंड, दहिसर, ठाणे, वाशी चेकनाक्यावरुन मुंबईत दाखल झाल्या. तर एपीएमसीतून ३४० गाड्या रवाना करण्यात आल्या. अशा एकूण ५६० गाड्या भाजीपाला मुंबईकरांना गुरुवारी पोहचविण्यात आला.

मुंबई एपीएमसीतील गर्दी रोखण्यात एपीएमसी प्रशासनाला यश आले असले, तरी मुंबई उपनगरातील स्थानिक किरकोळ व्यापाऱ्यांनी ऑर्डरने माल बुकींग करुन मागवावा असा प्रयत्न एपीएमसी करत आहे. शिवाय हे शक्य नसल्यास या किरकोळ व्यापाऱ्यांना उपनगरात थेट भाजीपाला विक्रीसाठी उपलब्ध करण्यासाठी पणन संचालकांनी थेट शेतकऱ्यांच्या शेतमालाला मुंबई शहरासह उपनगरात जाण्यासाठी परवानगी दिली आहे.

| बाजार | आवक | जावक |
|---|---|---|
| कांदाबटाटा | ३४ | ८२ |
| भाजीपाला | ११३ | ३४० |
| फळ | २०७ | १७५ |
| मसाला | ४० | ६५ |
| धान्य | ४११ | - |
| **एकूण** | ८०५ | ६६२ |

गुरुवारी २२० गाड्या या थेट मुंबई, उपनगरात पाठवण्यात आल्या. या गाड्यांची नोंद एपीएमसीच्या चेक नाके असलेल्या मुलुंड, दहिसर, ठाणे, वाशी नाक्यांवर करण्यात आली. यामुळे किरकोळ व्यापाऱ्यांना आणि सर्वसामान्य नागरिकांनाही जागेवरच भाजीपाला खरेदी करण्यास मोठी मदत झाली आहे. यामुळे मोठ्या प्रमाणावर गर्दी कमी करण्यात मदत झाल्याचे सचिव अनिल चव्हाण यांनी सांगितले.

गुरुवारी एकूण ६६२ गाड्या मुंबईत गेल्या. कांदा-बटाटाच्या ३४ गाड्यांची आवक झाली असून ८२ गाड्या मुंबईत पाठवल्या. फळ मार्केटमधून १७५ गाड्या मुंबईत रवाना करण्यात आल्या. थेट भाजीपाल्याच्या २२० गाड्या वगळता एपीएमसी मार्केटमधून गुरुवारी ६६२ गाड्या मुंबईत व्यापाऱ्यांनी पाठवल्या.



लोकमत

# राज्यातील ३०८ कृषी उत्पन्न बाजार समित्यांचाही मदतीचा हात

## पणन मंत्र्यांचे आदेश

### कोरोनाविरुद्धच्या लढाईत गरजूंसाठी समित्या बनणार सैनिक

गजानन अक्कलवार ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**कळंब (यवतमाळ) :** सर्वसामान्य नागरिकांच्या मुलभूत समस्या आणि त्यांना अडचणीतून बाहेर काढण्यासाठी राज्यातील ३०८ कृषी उत्पन्न बाजार समित्यांनी सर्वतोपरी मदत करण्याचे आदेश पणन विभागाने बुधवारी दिले आहे. येणाऱ्या काळात बाजार समितीच्या माध्यमातून गरजूंना मदतीचा हात मिळणार आहे.

कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे देशावर मोठे संकट आले आहे. संपूर्ण महाराष्ट्र लॉकडाऊन आहे. परिणामी शेतकरी, शेतमजुर, कामगार व हातावर आणून पानावर खाणाऱ्या लोकांना घरी बसावे लागले आहे. त्यांना उदरनिर्वाह करणे अवघड झाले आहे. राज्यात रोजगारासाठी आलेले कामगार, लॉकडाऊन असूनही वेगवेगळ्या कारणास्तव स्वत:च्या गावी जाण्याचा प्रयत्न करीत आहे. मात्र केंद्र शासन व सर्वोच्च न्यायालयाने गावी जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या लोकांसाठी निवारा व भोजनाची सोय करण्याचे आदेश दिले आहे. यासाठी प्रशासनासोबत सामाजिक संस्था पुढे आल्या आहे. आता सक्षम सहकारी संस्था म्हणून बाजार समितीलाही या कार्यात हातभार लावण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

**निवास व भोजन व्यवस्था करणार**

बाजार समितीने स्व:तच्या आवारात अथवा प्रशासनाने निर्धारित केलेल्या ठिकाणी गरजूंची राहण्याची सोय करुन त्यांच्या भोजनाची व्यवस्था करावी. यासोबतच गरजू लोकांना धान्य, आटा, डाळ, खाद्यतेल, साखर आदी दैनंदिन आवश्यक वस्तू पुरविण्याची योजना आखण्याचे सुचविले आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात संपूर्ण महाराष्ट्रात बाजार समितीच्या माध्यमातून मोठी मदत उभारली जाऊ शकते.

### मंत्री यशोमती ठाकुर यांची शिष्टाई



अडचणीच्या काळात राज्यातील बाजार समित्या चांगली मदत करु शकतात. त्यामुळे कळंब बाजार समितीचे सभापती प्रवीण देशमुख यांनी महिला व बालकल्याणमंत्री यशोमती ठाकुर यांना पत्र लिहले. राज्यातील बाजार समित्यांना मदत करण्याचा अनुषंगाने निर्देश देण्याची विनंती या पत्रातून करण्यात आली. यशोमती ठाकुर यांनी हा विषय पणनमंत्री बाळासाहेब पाटील यांच्याकडे मांडला. ना. पाटील यांनी लगेच सर्व बाजार समित्यांना गरजुंच्या मदतीसाठी पुढे येण्याचे आदेश दिले.

### संचालक प्रवीण देशमुख यांचा पुढाकार

महाराष्ट्रातील बहुतेक बाजार समित्यांचे वार्षिक बजेट करोडो रुपयात आहे. मुंबई बाजार समितीचे बजेट तर, हजारो कोटी रुपये आहे. त्यामुळे बाजार समितीचे प्रशासन मदतीसाठी समोर आल्यास गरजूंना मोठा दिलासा मिळू शकतो ही बाब ओळखून मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे नवनियुक्त संचालक प्रवीण देशमुख (यवतमाळ) यांनी त्यासाठी पुढाकार घेतला.

सकाळ अॅग्रोवन



मगरेवाडी, ता. शिरोळ : पणन मंडळाच्या टोल फ्री क्रमांकामुळे कोरोना लॉकडाऊनमध्ये वाहतूक सुरळीत असल्याने शेतकरी सुरज खुरपे यांच्या शेतातील ढोबळी मिरची बेळगाव, हैद्राबाद येथे पाठविण्यासाठी पॅकिंग सुरु आहे.

# फोन केला.. अन् ढोबळी मिरची बेळगावसह हैद्राबादला रवाना झाली

- 'पणन' च्या टोल फ्रि क्रमांकाचा थेट शेतकऱ्याला फायदा
- शिरोळच्या शेतकऱ्याचा अनुभव; इतरांनाही मार्गदर्शक

**गणेश कोरे**

पुणे : पणन मंडळाच्या आंतरराज्य शेतमाल वाहतूक नियंत्रण कक्षाचा थेट कोल्हापूरच्या ढोबळी मिरची उत्पादक शेतकऱ्याला झाला आहे. सुरज खुरपे (मगरेवाडी, ता. शिरोळ) या शेतकऱ्याची सध्या ढोबळी मिरचीची काढणी सुरु असून, बेळगावला माल पाठविला जात आहे. त्यांची गाडी बेळगाव सीमेवर एका गावात अडविल्यानंतर त्यांनी पणन मंडळाच्या १८००-२३३-०२४४ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधून समस्या सांगितली, यावेळी मंडळाचे अधिकाऱ्याने सरपंचांसोबत चर्चा करुन वाहन मार्गस्थ केल्याने शेतकऱ्यांस मोठा दिलासा मिळाला आहे.

कोरोना लॉकडाऊनमध्ये परराज्यांतून शेतमालाचा पुरवठा सुरळीत रहावा यासाठी राज्य कृषी पणन मंडळाने सुरु केलेल्या आंतरराज्य वाहतूक नियंत्रण कक्ष सुरु केला आहे. या नियंत्रण कक्षाद्वारे ९० फोन कॉल्सचे निराकरण करण्यात आल्याची माहिती मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांनी दिली. या कक्षासाठी २४ तास १४ अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

याबाबतची माहिती देताना पवार म्हणाले,''आंतरराज्यीय शेतमाल वाहतुकी बरोबरच राज्याअंतर्गत वाहतूक, बाजार समिती बंद बाबतची सद्यःस्थिती वाहतुकीबाबत पासेस, भाजीपाला उपलब्धता व पुरवठादार याबाबत फोन कॉल्स प्राप्त होत आहेत. या येणाऱ्या कॉलनिहाय प्रत्यक्ष अडचण काय आहे ते जाणून घेण्यात येत असून अडचणनिहाय समन्वयाने निराकरण करुन शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या, सहकारी संस्था, व्यापारी, वाहतूकदार, इ. घटकांचे समाधान करण्यात येत आहे. कॉलधारकांना त्यांच्या स्थानिक ठिकाणावरील कंट्रोल रुम्स, पोलीस क्षेत्रीय यंत्रणा आदि ठिकाणांची माहिती देऊन फळे व भाजीपाल्याची वाहतूक सुरळीत होण्याबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे.''

याचा शेतकऱ्यांना चांगला फायदा होत असल्याचा अनुभव ढोबळी मिरची उत्पादक सुरज खुरपे (रा.मगरेवाडी, शिरोळ) सांगितला. ते म्हणाले,''माझी सध्या ६ एकरवर ढोबळी मिरचीची लागवड असून, लॉकडाऊनमुळे मिरची फेकून देण्याची वेळ आली होती. पणन मंडळाच्या टोल फ्री क्रमांकामुळे मी माझी ६ टन ढोबळी घेऊन बेळगावला निघालो होतो. यावेळी भोसरवाडी येथील गावाने माझी गाडी अडवत पुढे जाण्यास मनाई केली. यावेळी मी टोल फ्रि क्रमांकावर संपर्क साधला. अधिकाऱ्यांनी ग्रामस्थ आणि सरपंचांना मार्गदर्शन करुन गाडी सोडण्यास सांगितली. आता वाहतूक सुरळीत असून, आज हैद्राबादला गाडी भरत आहे.''

URGES STATES TO ORDER DIRECTLY

# MSAMB creates alternate supply chain of onions

PARTHA SARATHI BISWAS
PUNE, APRIL 4

THE ONGOING lockdown, which has resulted in the disruption of the supply chain of fresh vegetables, has prompted the Maharashtra State Agricultural Marketing Board (MSAMB) to create an alternate marketing chain for onions.

In a bid to create a parallel supply chain, the MSAMB has collated an exhaustive list of onion farmers and traders, and circulated the same across the country for markets to deal with directly.

Sunil Pawar, managing director of MSAMB, said the idea was to ensure an alternate market chain is created, which will feed retail markets in this time of crisis. While wholesale fruits and vegetable markets are nor part of the lockdown, most are either functioning with skeletal staff or have suspended business for the time period. Most of the important onion markets in Nashik have also seen labour migrating to their respective states.

"The list we created has the names and contacts of almost all important farmer groups and traders in the important market," Pawar said. "This list was circulated across the country with instructions of them being contacted directly if necessary."

Maharashtra is the country's largest onion producer, cornering about 34 per cent of the national production. The kitchen staple is transported from markets of Nashik to states like Punjab, West Bengal, and Bihar. The bulb is transported to northern states via railways, while it is transported to southern ones via trucks.

Pawar said the lockdown and the disruption of the supply chain has provided a unique opportunity for farmer groups and farmer producer companies (FPCs) to create an alternative marketing chain. "In case of onions, we are planning to update this list regularly to include more active farmer groups to the list. Once established, this will enable creation of an alternate marketing chain," he said. For farmers, this means an almost eight to ten per cent increase in realisation, as they do not have to face deduction in terms of market fees. In addition, the creation of an alternate marketing chain will help keep prices stable, especially in times of glut.

# राज्यातून द्राक्षे, कांदा, आंबा निर्यातीस सुरुवात

## कृषी विभाग, पणन मंडळाच्या प्रयत्नांना यश

पुणे : पुढारी वृत्तसेवा

केंद्र व राज्य सरकारच्या प्रयत्नांमुळे बंद झालेली शेतमालाची निर्यात आता सुरू झालेली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने द्राक्षे, कांदा आणि आंब्यांच्या निर्यातीलाही सुरुवात झालेली आहे. कोरोनामुळे निर्यातीमध्ये येणारे अडथळे दूर करीत, राज्याचा कृषी विभाग, राज्य कृषी पणन मंडळ, केंद्राचे अपेडा कार्यालय आणि निर्यातदारांच्या पुढाकारामुळे हे शक्य झालेले आहे.

### इंग्लंडला प्रथमच भेंडी, हिरवी मिरची, दुधीची निर्यात

नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून इंग्लंडला प्रथमच मालवाहू विमान वाहतुकीद्वारे भेंडी, हिरवी मिरची आणि दुधी भोपाळ्याची प्रत्येकी एक हजार किलो याप्रमाणे एकूण तीन हजार किलोइतकी निर्यात नुकतीच झालेली आहे. त्या ठिकाणाहून मागणी असल्याने निर्यातीस सुरुवात झालेली आहे. अपेडाच्या ऑनलाईन प्रणालीतील व्हेजनेटमध्ये ज्या शेतकऱ्यांनी नोंदी केल्या होत्या, अशाच शेतकऱ्यांचा माल निर्यात झालेला असल्याचेही हांडे यांनी सांगितले.



कोरोनामुळे विमानसेवा बंद झाल्यानंतर समुद्रमार्गे होणाऱ्या द्राक्ष निर्यातीवरही हळूहळू परिणाम होत गेला. पॅकिंगसाठी कामगार न मिळणे, कंटेनर उपलब्धता नसणे, ड्रायव्हर न मिळणे, अशा समस्या आल्याने द्राक्ष निर्यातीचा वेगही मंदावल्याचे स्पष्ट झाले होते. मात्र, केंद्र सरकारने शेतमालाची निर्यात सुरु ठेवण्यासाठी योग्य त्या सूचना दिल्या. निर्यातीमध्ये येणाऱ्या स्थानिक पातळीवरील अडचणी सोडविण्यास प्राधान्य देण्यात आले. त्यामुळे निर्यात आता पूर्ववत होत असल्याची माहिती कृषी विभागाच्या निर्यात कक्षाचे प्रमुख आणि तंत्र अधिकारी गोविंद हांडे यांनी दिली.

ते म्हणाले की, द्राक्षांची २५६ कंटेनरमधून सुमारे ३ हजार ५८४ टन निर्यात युरोप आणि रशियात झालेली आहे. ही निर्यात सुमद्रमार्गे आता नियमितपणे सुरु झालेली आहे. त्यामध्ये नाशिकमधून १६३ कंटेनर, सांगली येथून ६४, सोलापूर १०, पुणे १७ आणि लातूरमधून २ कंटेनर इतक्या द्राक्ष निर्यातीचा समावेश आहे. कांद्याची १२० कंटेनरमधून २ हजार १६० टनाइतकी निर्यात ही युरोप आणि आखाती देशात झालेली आहे. त्यामध्ये नाशिकमधून १०४ कंटेनर तर सांगली येथून १६ कंटेनर इतक्या कांद्याचा समावेश आहे. तर मुंबई येथून ९ कंटेनरमधून १५३ टनाइतकी हापूस आंब्यांची निर्यात आखाती देशात झालेली आहे. ३० मार्चपासून ही निर्यात सुरु झालेली आहे. कोरोनामुळे उद्भवलेल्या परिस्थितीत अत्यावश्यक कामकाज खोळंबू नये म्हणून क्षेत्रिय स्तरावर कामकाजाचे नियोजन तसेच आपत्कालीन परिस्थितीत करावयाच्या उपाययोजनांसाठी कृषी आयुक्त सुहास दिवसे यांनी आयुक्तालयात राज्यस्तरीय नियंत्रण कक्ष कार्यरत केला. त्याचाही शेतमाल निर्यातीस फायदा झाल्याचे त्यांनी सांगितले.

# वसाहतींमध्ये थेट आंबा विक्री

## कोकण विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयाचा पुढाकार

लोकसत्ता प्रतिनिधी

**ठाणे:** टाळेबंदीच्या काळात ग्राहकापर्यंत थेट भाजीपाला पोहोचावा, यासाठी पुणे तसेच नाशिक जिल्ह्यातील शेतकरी व्यापाऱ्यांनी मुंबई ठाण्यात थेट भाजी विक्रीचा प्रयत्न जोमाने सुरू केला आहे. आता कोकणातील हापूस आंबा ही मुंबई महानगर क्षेत्रातील वसाहतींच्या प्रवेशद्वारपर्यंत पोहोचविण्यासाठी कोकणातील आंबा बागायतदारांनी प्रयत्न सुरू केले आहेत.

या आंबा विक्रीसाठी कोकण विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयाने पुढाकार घेतला असून मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पनवेल, कल्याण-डोंबिवली, मीरा-भाईंदर आणि वसई-विरार या महापालिकांनी कोकणाची आंबा विक्रीसाठी यंत्रणा उभी करावी, असे आवाहन कोकण विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयाने केले आहे.

मार्चअखेर आणि एप्रिलच्या सुरुवातीचा कालावधी हा कोकणाच्या हापूस आंबा निर्यातीचा सुवर्णकाळ असतो. मात्र, करोनामुळे देशातील तसेच परदेशातील वाहतूक व्यवस्था ठप्प असल्याने आंबा निर्यातीचा प्रश्न बागायतदारांसमोर उभा ठाकला आहे. यासाठी

रत्नागिरीतील शेतकऱ्यांनी मुंबई महानगर क्षेत्रातील वसाहतींच्या प्रवेशद्वारपर्यंत आंबा पोहोचविण्यासाठी नियोजन केले आहे. या नियोजनाला परवानगी मिळावी यासाठी काही दिवसांपूर्वी रत्नागिरीच्या शेतकऱ्यांनी कोकण विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयाकडे मागणी केली होती. शेतकऱ्यांच्या या मागणीची कोकण विभागीय कृषी सहसंचालकांनी दखल घेतली आहे. तसेच सहसंचालक कार्यालयाने आंबा विक्रीच्या नियोजनासाठी पुढाकार घेतला असून मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पनवेल, कल्याण-डोंबिवली, मीरा-भाईंदर आणि वसई-विरार या महापालिकांना त्यांच्या क्षेत्रातील वसाहतींमध्ये आंबा विक्री करण्यासाठी यंत्रणा उभी करण्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले आहे. कोकण कृषी सहसंचालकांकडून बागायतदारांची ही मागणी पूर्ण झाल्याने आम्हाला मोठा दिलासा मिळाला आहे, असे मत रत्नागिरीचे आंबा बागायतदार बिपिन माने यांनी व्यक्त केले आहे.

### साडे तीनशे रुपये डझनाने विक्री

**मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पनवेल, कल्याण-डोंबिवली, मीरा-भाईंदर आणि वसई-विरार या महापालिकांमध्ये काम करणारे कर्मचारी हे शहरातील विविध भागांमध्ये राहतात. या कर्मचाऱ्यांची ते राहत असलेल्या वसाहतीमध्ये आंबा विक्री करण्यास पुढाकार घ्यावा, असे आवाहनही कोकण विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयातर्फे महापालिका प्रशासनाला करण्यात आले आहे. कर्मचाऱ्यांनी ते राहत असलेल्या वसाहतीमध्ये आणि त्यांच्या नातेवाईकांमध्ये आंबा विक्री करण्यास पुढाकार घेतल्यास एका कर्मचाऱ्याला रत्नागिरीच्या शेतकरी गटांतर्फे १०० पेटी आंबे विक्री करण्यास उपलब्ध करून दिले जाणार आहेत. हे आंबे ३५० रुपये डझन इतक्या दरात विक्री करण्यासाठी उपलब्ध करून दिले जाणार आहेत.**



> “ यंदा करोनामुळे शेतकऱ्यांवर मोठे संकट आले असून यातून मार्ग काढण्यासाठी कोकण विभागीय कृषी सहसंचालक कार्यालय प्रयत्न करत आहे. कोकण विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयाकडून मुंबई महानगर क्षेत्रातील महापालिकांना आंबा विक्रीसाठी करण्यात आलेल्या आवाहनाला सर्वच महापालिका प्रशासन उत्तम प्रतिसाद देत आहेत.
>
> - विकास पाटील, कृषी सहसंचालक, कोकण विभाग.

# ‘लोकसत्ता’च्या वृत्ताची राज्यभरातून दखल

# पणन मंडळाची शेतमाल निर्यात सुविधा केंद्रे सुसज्ज

- जे. एन. पी. टी. बंदरातून एक लाख टन कांदा निर्यात पूर्ण
- पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांची माहिती

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

कोरोनामुळे उद्भवलेल्या परिस्थितीत करण्यात आलेल्या लॉकडाऊनच्या काळातही देशांतर्गत बाजारपेठेत आणि जागतिक बाजारपेठेत शेतमाल निर्यातीसाठी यशस्वी प्रयत्न करण्यात आले आहेत. कोकणातील हापूस आंब्यांची निर्यात नवी मुंबई येथून सुमद्रामार्गे काही प्रमाणात सुरू झालेली आहे. देशातून कांद्यावरील निर्यातबंदी १५ मार्च २०२० रोजी उठविल्यानंतर जे. एन. पी. टी. बंदरातून आतापर्यंत सुमारे एक लाख टन कांद्याची निर्यातही पूर्ण झाल्याची माहिती राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांनी दिली.

जे. एन. पी. टी. येथून कंटेनरची उपलब्धता, पोर्टवरील कस्टम क्लिअरन्ससह विविध कामे, फायटो प्रमाणपत्र उपलब्धता याबाबत निर्यातदार व निर्यातीशी संबंधित घटकांना मार्गदर्शन करण्यात येत आहे. आंबा निर्यात वाढीसाठी पणन मंडळाची वाशी येथील व्हेपर हिट ट्रीटमेंट सुविधा, विकीरण सुविधा, भाजीपाला निर्यात सुविधा केंद्र अद्ययावत करण्यात आलेले आहेत. जपानला आंबा निर्यातीपूर्वी व्हेपर हिट ट्रीटमेंट, तर अमेरिका येथे आंबा निर्यातीसाठी आवश्यक विकिरण प्रक्रिया करून आंबा निर्यात होणार असल्याचे ते म्हणाले.

याचे सहकारमंत्री बाळासाहेब पाटील, पणन विभागाचे प्रधान सचिव अनुपकुमार यांच्या सूचनान्वये पणन मंडळात फळे व भाजीपाला वाहतूक नियंत्रण कक्ष २६ मार्चपासून सुरू करण्यात आलेला आहे. त्यातून या कक्षाची मदत महाराष्ट्रातून परराज्यांमध्ये व परराज्यांमधून महाराष्ट्रात शेतीमालाच्या वाहतुकीस होत आहे. शेतीमालाच्या विक्री व्यवस्थेला चालना मिळून शेतकऱ्यांना त्याची मदत होत आहे. तसेच, निर्यातीकरितासुद्धा शेतकरी व निर्यातदारांना मदत होत आहे.

राज्यातून आंब्यांची मोठ्या प्रमाणात निर्यात होत असते. निर्यातीच्या आंब्यांची वाहतूक नवी मुंबईमार्गे होत असताना कोव्हिड-१९ च्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर काही अडचणी येऊ नयेत, तसेच आंबा निर्यातीमध्ये अडथळा येऊ नये याकरिता निर्यातीकरिता आवश्यक असलेला आंबा, आंब्यांचे प्रक्रियायुक्त पदार्थ, त्याचे पॅकिंजिंगसाठीचे साहित्य, कोरोगेटेड बॉक्सेस, पॅलेट्स इत्यादी अनुषंगिक माल वाहतूक विनाअडथळा होण्याकरिता सुलभता देण्याबाबत क्षेत्रिय यंत्रणेस तातडीने सूचना देण्याकामी कोकण विभागीय आयुक्त, कोकण पोलिस आयुक्तांना विनंती करण्यात आली. त्यामुळे आंब्यांची निर्यात विनाविलंब होण्यास मदत झाली, असेही त्यांनी सांगितले.

## संत्रा पश्चिम बंगाल, दुबईला

विदर्भातील संत्र्यांची पश्चिम बंगाल येथे रस्ते वाहतुकीद्वारे निर्यात सुरू असताना तेथील सीमेवर काही ट्रक्स अडविण्यात आले. नाशवंत माल असल्याने तत्काळ संत्रा निर्यात होणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत पश्चिम बंगाल राज्याच्या पणन मंडळाशी पत्रव्यवहार व पाठपुरावा केला असता अडकलेले संत्र्यांचे ट्रक्स रवाना झाले. आता निर्यात सुरळीत सुरू झाली आहे. तर कृषी पणन मंडळ, अपेडा व एस.डी.एफ. प्रॉडक्शन प्रा.लि. यांच्या संयुक्त विद्यमाने दुबई येथेही संत्र्यांची निर्यात करण्यात आल्याचेही पवार यांनी सांगितले.

लोकमत

### १०५ मेट्रिक टन हापूस निर्यात : पणन, कृषी विभागाकडून वाहतुकीला मिळाली चालना

# जलवाहतुकीने हापूस पोहोचला आखातात

लोकमत न्यूज नेटवर्क

**रत्नागिरी** : पणन विभाग व कृषी विभागाच्या प्रयत्नाने हापूस निर्यातीला चालना मिळाली असून, जलवाहतुकीव्दारे १०५ टन हापूस आखाती प्रदेशात निर्यात करण्यात आला आहे. नवी मुंबईतील वाशी मार्केट येथून पाच कंटेनरव्दारे १०५ मेट्रिक टन हापूस संयुक्त अरब अमिराती आणि ओमानमध्ये निर्यात करण्यात आला आहे.

कोरोनामुळे लॉकडाऊनचे संकट जगभरातील देशांवर आहे. लॉकडाऊनमुळे शेतमालासह विविध व्यवसायांना फटका बसला आहे. हापूस हंगाम यावर्षी उशिरा असून, ऐन आंबा हंगामातच कोरोनाचे संकट उभे राहिल्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाले होते. उष्म्यामुळे आंबा तयार झाला असतानाच विक्री कशी करावी, असा प्रश्न उभा राहिला होता. जीवनावश्यक वस्तूंमध्ये फळे व भाजी विक्रीसाठी परवानगी मिळाल्यानंतर शेतकरी सुखावला होता. परंतु मुंबईत ग्राहक नसल्याची ओरड व्यापाऱ्यांनी सुरु केली.

शिवाय त्याचा परिणाम म्हणजे दर गडगडले. त्यानंतर पणन मंडळ, कृषी विभाग, आत्मा यासह काही खासगी व्यापाऱ्यांनी हापूसच्या विक्रीसाठी थेट ग्राहकांपर्यंत साखळी निर्माण करण्यासाठी प्रयत्न सुरु केले आहेत.

नवी मुंबईतील एपीएमसी मार्केटमध्ये दिवसाला वीस ते तीस हजार पेट्या विक्रीसाठी येत आहेत. ग्राहकांअभावी मुंबई व उपनगरातील विक्रीवर परिणाम झाला आहे. आखाती देशातून आंब्याला मागणी आहे. मात्र, हवाई वाहतूक बंद असल्याने समुद्रमार्गे वाहतूक करण्यासाठी शासनाची परवानगी घेण्यात आली. निर्यातीला चालना देण्यासाठी हालचाली सुरु होत्या. त्यानंतर पाच कंटेनर आखाती प्रदेशात पाठविण्यात आले. त्यातील चार कंटेनर संयुक्त अरब अमिराती येथे, तर एक कंटेनर ओमानमध्ये पाठविण्यात आला.

या दोन्ही देशांना पुरवण्यात आलेला माल निर्यातदारांमार्फत पाठविण्यात आला असल्याची माहिती पणन मंडळाने दिली. एकूण १०५ मेट्रिक टन आंब्याची निर्यात सुरु झाल्याने वाशी मार्केटमधील पेट्यांची साठवणूक कमी होऊन दर स्थिर राहण्यास मदत होणार आहे. दि. १५ एप्रिलनंतर मोठ्या प्रमाणात आंबा बाजारात येण्याची शक्यता असून, सध्या ग्राहकांअभावी पेटीला पाचशे रुपयांपासून ते दोन हजार रुपयांपर्यंत दर देण्यात येत आहे. ही वाहतूक सुरु राहिल्यास आंबा निर्यातीचे प्रमाण वाढण्याची शक्यताही वर्तविण्यात येत आहे.

> कोरोनामुळे हापूस आंब्याची निर्यात थंडावली आहे. ही निर्यात होण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. जलवाहतुकीद्वारे संयुक्त अरब अमिराती आणि ओमानमध्ये निर्यात करण्याचा प्रयत्न केला. १०५ मेट्रिक टन आंबा निर्यात झाला असून, पुढील काही दिवसात निर्यात वाढू शकेल.

# राज्यभरात भाजीपाला, फळांचा पुरवठा सुरळीत ठेवा

## पणनमंत्र्याचे बाजार समित्यांना आदेश

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई** : करोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी मुंबई आणि पुणे बाजार समितीच्या आवारात निर्जंतुकीकरण करून, तसेच सामाजिक अंतर, सॅनिटायझरचा वापर करून बाजार समितीचे कामकाज सुरळीत सुरू आहे. त्याच धर्तीवर इतर बाजार समित्यांनी सुद्धा आवश्यक त्या सर्व उपाययोजना करून राज्यभरातील अन्नधान्य, भाजीपाला, फळे यांचा पुरवठा सुरळीत सुरू ठेवावा, असा आदेश सहकार व पणनमंत्री बाळासाहेब पाटील यांनी मंगळवारी दिला.

बंदीमुळे राज्यातील अनेक ठिकाणी भाजीपाला आणि फळांची टंचाई निर्माण झाल्याने भाववाढ होत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. त्याची दखल घेत पणनमंत्र्यांनी राज्यातील सर्व विभागीय सहनिबंधक, जिल्हा उपनिबंधक तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिवांशी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधत परिस्थितीचा आढावा घेतला.

बाजार समितीचे कामकाज सुरू ठेवण्यासाठी काही अडचणी येत असतील तर स्थानिक प्रशासनाची मदत घेऊन कामकाज सुरू ठेवावे. बाजार समितीच्या आवारात सामाजिक अंतर पाळावे आणि सॅनिटायझरचाही वापर करावा. तसेच शेतकऱ्यांचा शेतमाल शेतातून निघाल्यापासून ते बाजार समितीमध्ये येईपर्यंत आवश्यक ती जबाबदारी घ्यावी, शेतकऱ्यांना आणि ग्राहकांना त्रास होता काम नये, याची सर्व जबाबदारी बाजार समितीने घ्यावी, अशा सक्त सूचना पाटील यांनी बाजार समितीच्या पदाधिकाऱ्यांना दिल्या.



### सोसायट्यांशी संपर्क साधण्याचे निर्देश

सर्व विभागीय सहनिबंधक तसेच जिल्हा उपनिबंधक आणि साहाय्यक निबंधक यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांशी संपर्क साधून त्यांना शेतकरी उत्पादक गट उत्पादक कंपन्यांमार्फत थेट फळे आणि भाजीपाला पुरवठा करण्यासाठी प्रयत्न करावेत. त्यामुळे ग्राहक घराबाहेर येणार नाहीत आणि गर्दीही होणार नाही. तसेच सहकार आणि पणन विभागांतील सर्व अधिकाऱ्यांनी या आपत्कालीन परिस्थितीमध्ये मानवतेच्या दृष्टीने सहकार्य करणे आवश्यक असून कोणीही मुख्यालय सोडू नये, असेही पाटील यांनी या वेळी सांगितले.

बैठकीस सहकार आयुक्त अनिल कवडे, कृषी पणन संचालक सुनील पवार, मुंबई बाजार समितीचे प्रशासक अनिल चव्हाण, एमसीडीसीचे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद आकरे, पुणे बाजार समितीचे प्रशासक बी. जे. देशमुख उपस्थित होते.

सकाळ

# बाजार समित्यांशी पणन मंत्र्यांची चर्चा

## पुरवठा सुरळीत ठेवण्याच्या सूचना

**सकाळ न्यूज नेटवर्क**

मुंबई, ता. ७ : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्यात बाजार समितीचे कामकाज सुरू ठेवून भाजीपाला, फळे यांचा पुरवठा सुरळीत सुरू ठेवावा, अशा सूचना सहकार व पणन मंत्री बाळासाहेब पाटील यांनी दिल्या. राज्यातील सर्व विभागीय सहनिबंधक, जिल्हा उपनिबंधक तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिवांची सहकार मंत्र्यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे आढावा बैठक घेतली.

पाटील म्हणाले, बाजार समित्यांमध्ये कामकाज चालू ठेवण्यासाठी काही अडचणी येत असतील, तर स्थानिक प्रशासनाची मदत घेऊन कामकाज सुरू ठेवावे. आवारात सोशल डिस्टन्सिंग पाळावे आणि सॅनिटायझरचाही वापर करावा. सहकार व पणन विभागातील सर्व अधिकाऱ्यांनी कोरोना या आपत्कालीन परिस्थितीत मानवतेच्या दृष्टीने सहकार्य करणे आवश्यक असून कोणीही मुख्यालय सोडू नये, अशा स्पष्ट सूचना दिल्या.

सर्व विभागीय सहनिबंधक तसेच जिल्हा उपनिबंधक आणि सहाय्यक निबंधक यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांशी संपर्क साधून त्यांना शेतकरी उत्पादक गट, उत्पादक कंपन्यांमार्फत थेट फळे आणि भाजीपाला पुरवठा करण्यासाठी प्रयत्न करावेत, त्यामुळे ग्राहक घराबाहेर येणार नाहीत आणि गर्दीही होणार नाही, असेही पाटील यांनी या वेळी सांगितले.

सद्यस्थितीत सांगली बाजार समितीमध्ये हळदीचे सौदे बंद असून हे पूर्ववत करण्यासाठी धुळे बाजार समितीने जी टोकन पद्धत राबवली आहे, त्या धर्तीवर त्वरित कामकाज सुरू करण्यात यावे. सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यांतील जिल्हा उपनिबंधक यांनी कृषी विभागाशी समन्वय ठेवून कामकाज करावे, अशा सूचनाही या वेळी केल्या.

बैठकीस सहकार आयुक्त अनिल कवडे, कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार, सरव्यवस्थापक दीपक शिंदे, एमसीडीसीचे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद आखरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रशासक बी. जे. देशमुख, उपसंचालक टिकोळे, सहकार मंत्र्यांचे खासगी सचिव संतोष पाटील, संबंधित अधिकारी उपस्थित होते.

Pune, Main
08/04/2020 Page No. 5

# राज्यभरात भाजीपाला, फळांचा पुरवठा सुरळीत ठेवा

## पणनमंत्र्याचे बाजार समित्यांना आदेश

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई** : करोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी मुंबई आणि पुणे बाजार समितीच्या आवारात निर्जंतुकीकरण करून, तसेच सामाजिक अंतर, सॅनिटायझरचा वापर करून बाजार समितीचे कामकाज सुरळीत सुरू आहे. त्याच धर्तीवर इतर बाजार समित्यांनी सुद्धा आवश्यक त्या सर्व उपाययोजना करून राज्यभरातील अन्नधान्य, भाजीपाला, फळे यांचा पुरवठा सुरळीत सुरू ठेवावा, असा आदेश सहकार व पणनमंत्री बाळासाहेब पाटील यांनी मंगळवारी दिला.

बंदीमुळे राज्यातील अनेक ठिकाणी भाजीपाला आणि फळांची टंचाई निर्माण झाल्याने भाववाढ होत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. त्याची दखल घेत पणनमंत्र्यांनी राज्यातील सर्व विभागीय सहनिबंधक, जिल्हा उपनिबंधक तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिवांशी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधत परिस्थितीचा आढावा घेतला.

बाजार समितीचे कामकाज सुरू ठेवण्यासाठी काही अडचणी येत असतील तर स्थानिक प्रशासनाची मदत घेऊन कामकाज सुरू ठेवावे. बाजार समितीच्या आवारात सामाजिक अंतर पाळावे आणि सॅनिटायझरचाही वापर करावा. तसेच शेतकऱ्यांचा शेतमाल शेतातून निघाल्यापासून ते बाजार समितीमध्ये येईपर्यंत आवश्यक ती जबाबदारी घ्यावी, शेतकऱ्यांना आणि ग्राहकांना त्रास होता काम नये, याची सर्व जबाबदारी बाजार समितीने घ्यावी, अशा सक्त सूचना पाटील यांनी बाजार समितीच्या पदाधिकाऱ्यांना दिल्या.

बैठकीस सहकार आयुक्त अनिल कवडे, कृषी पणन संचालक सुनील पवार, मुंबई बाजार समितीचे प्रशासक अनिल चव्हाण, एमसीडीसीचे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद आकरे, पुणे बाजार समितीचे प्रशासक बी. जे. देशमुख उपस्थित होते.



### सोसायट्यांशी संपर्क साधण्याचे निर्देश

सर्व विभागीय सहनिबंधक तसेच जिल्हा उपनिबंधक आणि साहाय्यक निबंधक यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांशी संपर्क साधून त्यांना शेतकरी उत्पादक गट उत्पादक कंपन्यांमार्फत थेट फळे आणि भाजीपाला पुरवठा करण्यासाठी प्रयत्न करावेत. त्यामुळे ग्राहक घराबाहेर येणार नाहीत आणि गर्दीही होणार नाही. तसेच सहकार आणि पणन विभागांतील सर्व अधिकाऱ्यांनी या आपत्कालीन परिस्थितीमध्ये मानवतेच्या दृष्टीने सहकार्य करणे आवश्यक असून कोणीही मुख्यालय सोडू नये, असेही पाटील यांनी या वेळी सांगितले.

# फळे, भाजीपाला निर्यातीसाठी पॅकिंग साहित्याचा तुटवडा

➔ पान १ वरून

सध्या केवळ दुबईमध्ये निर्यात सुरू करण्यात आली आहे. मात्र गेल्या अनेक दिवसांपासून बंदरात अडकलेले फळे आणि भाज्यांचे कंटेनरच पुढे पाठवण्यात आले आहेत. आता नवीन माल निर्यात करावयाचा झाल्यास त्यासाठी निर्यातीच्या पॅकिंगसाठी लागणारे साहित्य मिळणे कठीण झाले आहे. भाज्या, फळे निर्यात करावयाची झाल्यास त्यासाठी लागणारे खोकी, आत टाकावा लागणारा कागद, त्यावर लावण्यात येणारी चिकटपट्टी हे प्राथमिक साहित्य अत्यंत गरजेचे आहे. मात्र या साहित्याच्या कंपन्या बंद आहेत. त्यामुळे हा माल निर्यातदारांना मिळत नाही. या कंपन्यांना माल पुरवण्याची परवानगी द्यावी, यासाठी बाजार समितीमधील अनेक निर्यातदारांनी, निर्यातीसाठी सरकारने तयार केलेल्या ''वॉर रूम''मध्येही मदत मागितली. त्यानुसार कोकण आयुक्तांनी निर्यातीसाठी संबंधित परवानग्या देण्याचे आदेश दिले आहेत. मात्र तरीदेखील या कंपन्यांना मालाचा पुरवठा करण्याची परवानगी मिळत नसल्याने आम्हांला निर्यात करणे शक्य होत नसल्याचे फळ बाजारातील संचालक संजय पानसरे यांनी सांगितले.

सध्या बाजारात द्राक्षे, कलिंगड, टरबूज आणि आंबा मोठ्या प्रमाणात येत आहे. कोकण, कर्नाटकमधून सध्या आंब्याचीही आवक वाढत आहे. हा आंब्याचा हंगाम असल्याने आता आंब्याचा व्यापार सुरु होण्याची शक्यता आहे. मात्र बाजारातील परिस्थिती पाहता हे शक्य होत नसल्याने आंब्याला येथेही उठाव नाही आणि निर्यात करावयाचे झाल्यास निर्यातही करता येत नाही. त्यामुळे व्यापारी आणि निर्यातदार दोन्ही त्रस्त आहेत. व्यापारही थंडावला असून शेतकऱ्यांचेही नुकसान होत आहे. त्यामुळे निर्यातीच्या आणि विक्रीच्या मार्गातील हे अडथळे दूर करण्याची गरज आहे.

# फळे, भाजीपाला निर्यातीसाठी पॅकिंग साहित्याचा तुटवडा

## हापूस आंब्याची निर्यातही रखडली

**मुंबई (प्रतिनिधी) :** 'कोरोना'च्या प्रादुर्भावामुळे महिनाभरापासून फळे आणि भाजीपाल्याची युरोपीय आणि आखाती देशांना होणारी निर्यात ठप्प झाली होती. मात्र पणन मंडळ आणि सरकारने पुढाकार घेतल्याने निर्यात सुरु करण्यात प्रशासनाला यश आले आहे. त्यानुसार 'जेएनपीटी'मध्ये अडकलेला भाजीपाला आणि फळांच्या काही कंटेनरची निर्यात करण्यात आली आहे. त्यामुळे निर्यात सुरु झाल्याचा आनंद निर्यातदारांना झाला असतानाच दुसरीकडे निर्यात करण्यासाठी लागणाऱ्या वस्तूंच्या कंपन्यांची गोदामे बंद असल्याने निर्यातीच्या पॅकिंगसाठी लागणारे साहित्य मिळणे कठीण झाले आहे. त्यामुळे निर्यात खुली होऊनही अनेकांना निर्यात करणे कठीण झाले आहे.

### 'अडचणी सोडवण्याचे काम सुरु'

दरम्यान, निर्यात करणे सहज शक्य व्हावे, यासाठी बाजार समितीमध्ये विशेष कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षाचे मुख्य भास्कर पाटील यांना या अडचणींबाबत विचारले असता, त्यांनी ज्या काही अडचणी येत आहेत, त्या सोडवण्याचे काम आम्ही करत आहोत. त्या अनुषंगाने विविध घटकांना मदत सुरु असल्याचे सांगितले.

युरोपीय देशात होणारी भाजीपाला आणि फळांची निर्यात पूर्णपणे ठप्प आहे.

पान ४ वर

# गृहनिर्माण संस्थांमध्ये घरपोच धान्य, भाजीपाला

## सहकार विकास महामंडळाचा पुढाकार

**पुणे (प्रतिनिधी) :** कोरोना विषाणूचे संकट दिवसेंदिवस अधिक भयावह होत असताना, नागरिकांची किराणा माल आणि भाजीपाल्याची गैरसोय होऊ नये यासाठी राज्य सरकारच्या सहकार विकास महामंडळाने गृहनिर्माण संस्थांमध्ये थेट धान्य, भाजीपाला आणि फळे पुरवण्यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. संस्थांमधील सदस्यांनी मागणी



नोंदविल्यास धान्य आणि किराणा दोन दिवसांत तर, ताजा भाजीपाला दुसऱ्या दिवशी घरपोच मिळणार आहे.

पान ४ वर →

*कोरोनाचा प्रादुर्भाव वाढू नये यासाठी सोसायट्यांमधील सभासदांना रास्त दरात घरपोच धान्य, भाजीपाला आणि फळे मिळावीत यासाठी सहकार महामंडळाने हा निर्णय घेतला आहे. भविष्यात प्रत्येक सोसायटीसाठी बाराही महिने ही सुविधा उपलब्ध करून देणार आहे.*

— **मिलिंद आकरे,** व्यवस्थापकीय संचालक, राज्य सहकारी महामंडळ

# गृहनिर्माण संस्थांमध्ये घरपोच धान्य, भाजीपाला

पान १ वरून

"घराबाहेर पडून नका येऊ कोरोनाच्या सांनिध्यात, आम्ही पोचवू शेतमाल आपल्या दारात'' हे ब्रीदवाक्य घेऊन महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ प्रत्येक सोसायटीत पोचणार आहे. सहकार व पणन मंत्री बाळासाहेब पाटील यांच्या सूचनेनुसार विशेष कार्याधिकारी संतोष पाटील, राज्य सहकार महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद आकरे, जिल्हा उपनिबंधक नारायण आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली ही योजना राबविण्यात येणार आहे. सोसायट्यांमधील सभासद आणि शेतकरी, शेतमाल उत्पादक कंपन्यांमध्ये महामंडळ समन्वयाची भूमिका बजावणार आहे. एखाद्या सभासदाने संकेतस्थळावर जाऊन धान्य किंवा भाजीपाल्याची मागणी नोंदविल्यास त्यानुसार महामंडळाचे अधिकारी संबंधित शेतकरी आणि कंपनीसोबत संपर्क साधतील. त्यानुसार सोसायट्यांना घरपोच पुरवठा करण्यात येईल.

## अशी नोंदवा मागणी...

- महाराष्ट्र राज्य सहकार महामंडळाच्या www.mcdc.com या संकेतस्थळावर जाऊन धान्य, किराणामाल, पालेभाज्या आणि फळांची मागणी नोंदविता येईल.
- गृहनिर्माण संस्थेमधील प्रत्येक सदस्याला मागणी नोंदवता येईल. यामध्ये समन्वयक म्हणून संस्थेचे अध्यक्ष, सचिव काम पाहतील.
- प्रत्येक संस्थेला विशिष्ट सांकेतांक क्रमांक देणार आहे. त्याचा वापर करून सभासद मागणी नोंदवू शकतील.

**नोंदणीसाठी येथे साधा संपर्क...**
९४०४५१५५३७, ९२२५५६३९८७
८४८३८८१०१८

## संकेतस्थळावर अर्जात भरावयाची माहिती :

गृहनिर्माण संस्थेचे नाव, पत्ता, सदस्याचे नाव, मोबाईल क्रमांक व शेतमालाचा तपशील : गहू, ज्वारी, बाजरी, तांदूळ, पीठ, डाळी, किराणामाल, तेल, मसाले, सुकामेवा, लोणचे, पापड, भाजीपाला, फळभाज्या, फळे, बेकरी पदार्थ, अंडी, दुग्धजन्य पदार्थ याची मागणी नोंदविता येईल.

# शेतमाल पुरवठा समन्वयासाठी पणन मंडळाचा पुढाकार

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**लॉकडाऊनदरम्यान जीवनावश्यक वस्तूंचा विशेषत: शेतमालाचा पुरवठा सुरळित करण्याच्या दृष्टिकोनातून पणन मंडळाकडून पावले उचलली जात असून, त्यातील विविध समस्या दूर करण्याचा प्रयत्न करत आहे. पुणे शहरात भाजीपाला वितरणासह इतर अत्यावश्यक सेवेचा पुरवठा शहरातील ग्राहक, विविध गृहनिर्माण सहकारी संस्थांना करण्यासाठी छोट्या वाहनांची (३ चाकी, ४ चाकही, पिकअप वाहन इत्यादी) मागणी आहे. परंतु शेतकरी अथवा शेतमाल पुरवठादारांस बऱ्याच वेळा वाहन उपलब्ध होत नाही. शेतमाल शहरी भागात पुरवठा करण्यास विविध प्रकारच्या अडचणी येत आहेत. या मुख्य अडचणीवर मात करण्यासाठी वाहनधारकांची नोंदणी करण्याचा निर्णय कृषी पणन मंडळाने घेतला आहे.**

- **शहरात शेतकऱ्यांना वाहन उपलब्धतेतील अडचणी सोडविणार**
- **वाहनधारकांच्या नोंदणीसाठी किसान हेल्प लाईनची सुविधा**

## वाहतूक खर्च शेतकरी, वाहन मालकांनी ठरवावा...

वाहतूक खर्च हा शेतमाल पुरवठादार व वाहन चालक, मालकांनी आपापसात ठरवून घ्यावा. वाहतुकीदरम्यान शेतीमालाचे कोणत्याही कारणामुळे होणारे नुकसान, विलंब, संभाव्य अपघात इत्यादी अडचणीस कृषि पणन मंडळ जबाबदार राहणार नाही. तरी शहरी भागात ज्यांना शेतीमालाचा पुरवठा करावयाचा आहे व शेतमाल ज्या वाहन चालकांना वाहतूक करावयाची आहे, अशांनी कृषि पणन मंडळाच्या किसान हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा, असेही आवाहन पवार यांनी केले आहे.

राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक व राज्याचे पणन संचालक सुनिल पवार यांनी सांगितले की, शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या, शेतकरी गट व शेतमाल पुरवठादारांनी शहरात आणलेला शेतीमाल गृहनिर्माण सहकारी संस्थेतील ग्राहकांना वितरित करण्यासाठी सहज वाहन उपलब्ध झाल्यास शहरी भागात शेतमालाचा पुरवठा सुरळित होण्यासाठी उपयोग होवू शकतो. यासाठी छोट्या वाहन धारकांनी अथवा वाहन मालकांनी कृषि पणन मंडळाच्या किसान हेल्प लाईन क्रमांक १८००-२३३-०२४४ द्वारे आपली माहिती नोंदवावी. त्यामध्ये वाहन चालकाचे नाव, वाहन क्रमांक, वाहनांचा प्रकार इत्यादी माहितीचा समावेश आहे.

ज्या शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या, शेतकरी गट व शेतमाल पुरवठादार यांना अत्यावश्यक सेवा म्हणून शहरी भागात शेतमालाचा पुरवठा करावयाचा असल्यास व त्या करिता सदर वाहनांची आवश्यकता असल्यास त्या वाहनाची माहिती कृषि पणन मंडळामार्फत दिली जाईल. कृषि पणन मंडळ या वाहतूक व्यवस्थेमध्ये समन्वयकाचे काम करीत असून वाहन चालक, मालक यांनी शहरी भागात शेतमालाचा पुरवठा करीत असताना त्यासाठी आवश्यक त्या परवानग्या, पासेस संबंधितांनी घेण्यात यावेत.

# वाहन उपलब्धतेसाठी हेल्पलाइन सुरू

भाजीपाला, अत्यावश्यक सेवेचा पुरवठा ग्राहक तसेच सोसायट्यांना करण्यासाठी छोट्या तीन चाकी वाहनांची मागणी होत आहे. शेतकऱ्यांना ते उपलब्ध होत नसल्याने अडचणी येत आहेत. त्यांना वाहन उपलब्ध करण्यासाठी कृषी पणन मंडळाच्या किसान हेल्पलाइन क्रमांक १८००२३३०२४४ या द्वारे चालकाचे नाव, क्रमांक याची माहिती नोंदवावी. शेतकरी, शेतमाल उत्पादक कंपन्या, शेतकरी गट, शेतमाल पुरवठादारांना अत्यावश्यक सेवा म्हणून पुरवठ्यासाठी वाहनाची माहिती कृषी पणन मंडळामार्फत दिली जाईल, असे राज्याचे पणन संचालक सुनील पवार यांनी सांगितले.



रा

CS Scanned with CamScanner

# हापूस खरेदीसाठी 'पणन' प्रयत्नशील

- वेबसाईटवर नोंदणीचे आवाहन
- ग्राहक, सोसायट्यांची १०० डझनापर्यंत मागणी आवश्यक
- कोरोनामुळे आंबा महोत्सव होणार नाही

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

आकर्षक रंग, चवीने गोड व सुवासीकपणा अशा गुणांचे वरदान कोकणातील हापूस आंब्यांस लाभले आहे. असा हा आंबा पुणेकरांना मिळावा यासाठी दरवर्षी पणन मंडळाकडून शहरात आंबा महोत्सव आयोजित करण्यात येतो. मात्र, कोरोनामुळे यंदा हा आंबा महोत्सव होणार नाही. त्यामुळे हा आंबा चोखंदळ पुणेकरांपर्यंत पोहोचवण्याच्या हेतूने पणन मंडळाने पावले उचलली असून, थेट कोकणातील शेतकऱ्यांकडून इच्छुकांनी हापूस खरेदी करण्यासाठी राज्य कृषी पणन मंडळांच्या वेबसाईटवर नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



कोकणातील आंबा उत्पादकांना विक्रीसाठी शहरात यावे लागू नये. तसेच शहरातील ग्राहकांनाही घराबाहेर किंवा सोसायटीबाहेर येणे सध्या अडचणीचे आहे. त्याकरिता उत्पादक ते ग्राहक या दोघांनाही ऑनलाइन पोर्टलद्वारे आंबा खरेदी-विक्रीची माहिती उपलब्ध व्हावी, यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या www.msamb.com या वेबसाईटवरील Buyer Seller Information या लिंकद्वारे खरेदीदारांना नोंदणीची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. कृषी पणन मंडळाने या पोर्टलवर कोकणातील देवगड व रत्नागिरी हापूस आंबा उत्पादकांची नोंदणी सुरू केली आहे. त्यामध्ये आंबा उत्पादकांचे नांव, संपर्क क्रमांक, कोणत्या जातीचा आंबा उपलब्ध आहे, आदींचा तपशील पोर्टलवर उपलब्ध आहे. त्यामुळे पुणे, मुंबई तसेच इतर शहरातील वैयक्तिक ग्राहक अथवा सहकारी गृहनिर्माण संस्थांना त्यांची आंब्यांची मागणी पोर्टलवर नोंदविता येईल. विशिष्ट आंबा उत्पादकांशी संपर्क करता येऊ शकेल. पणन मंडळाने कोकणातील आंबा उत्पादकांच्या सोयीसाठी गुलटेकडी येथील वखार महामंडळाचे गोदामदेखील तात्पुरते साठवणुकीची व्यवस्था म्हणून उपलब्ध केले आहे. आंबा खरेदीकरिता किमान मर्यादा १०० डझन असणार आहे, तसेच आंबा थेट सोसायटीमध्ये पोहोच करता यावा याकरिता वाहन व्यवस्थादेखील उपलब्ध करण्यात आली आहे.

तीन, चारचाकी वाहने असणाऱ्यांची घेणार मदत

# भाजीपाला वाहतुकीवर 'पणन'कडून तोडगा

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १३ - लॉकडाऊनमुळे ग्राहकांना भाजीपाला मिळण्यात अडचणी येत आहेत. त्या दूर करण्यासाठी कृषी पणन महामंडळाने पुढाकार घेतला असून ज्यांच्याकडे तीनचाकी किंवा चारचाकी पीकअप वाहने आहेत. त्यांनी आपली वाहने उपलब्ध करून दिल्यास त्यांच्यामार्फत शेतकऱ्यांचा शेतमाल गृहनिर्माण सहकारी संस्थांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहेत.

राज्यात लॉकडाऊन वाढला तरी अत्यावश्यक सेवेचा पुरवठा होणे गरजेचे आहेत. त्यात प्रामुख्याने शेतमालाच्या पुरवठ्याची मोठी अडचण निर्माण होत आहे. बाजार समित्या बंद असल्याने कृषी पणन मंडळाने स्वत:ची यंत्रणा सुरू केली आहे. या यंत्रणेमध्ये सगळ्यात मोठी अडचण आहे, ती शेतकऱ्यांकडे वाहने उपलब्ध नाहीत. त्यामुळे ही वाहने उपलब्ध करून देण्याची जबाबदारी पणन मंडळाने घेतली आहे. त्यासाठी तीन ते चारचाकी पीकअप वाहने उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

या वाहनांमध्ये शेतकऱ्यांचा शेतमाल भरून तो विविध गृहनिर्माण संस्थांमध्ये पोहोचविण्यात येणार आहे. त्यासाठी शेतकरी गटाने किंवा शेतमाल पुरवठादाराने कृषी पणन मंडळाला संपर्क साधायचा आहे. पणन मंडळातर्फे त्यांना वाहन उपलब्ध करून दिले जाईल. त्यासाठी संबंधितांनी कृषी पणन मंडळाचा हेल्पलाइन क्रमांक १८००-२३३-०२४४ यावर संपर्क करावा लागणार आहे.

> या योजनेत पणन मंडळ समन्वयकाची भूमिका घेणार आहेत. ज्यांच्याकडे पीकअप वाहने उपलब्ध आहेत तसेच ज्यांना शेतमाल पुरवठा करायचा आहे. त्यांनी आमच्या हेल्पलाइनवर संपर्क करावा. या सेवेमुळे ग्राहकांना थेट गृहनिर्माण संस्थांमध्येच शेतीमाल उपलब्ध होणार आहे.
>
> - सुनिल पवार, पणन संचालक



**शेतमाल गृहनिर्माण संस्थांपर्यंत पोहोचविता येणार**

सकाळ अॅग्रोवन

# पणन मंडळाचा आंबा महोत्सव यंदा ऑनलाइन

## ग्राहकांना संघटित नोंदणीद्वारे आंबा मिळणार घरपोच

**पुणे (प्रतिनिधी)**: कोरोना लॉकडाऊनमुळे सर्वच शेतमाल उत्पादकांबरोबरच आंबा उत्पादक शेतकरी संकटात सापडला आहे. यामुळे यंदाच्या आंबा हंगामात अक्षय्य तृतीयेला आंब्याला बाजारपेठ मिळावी आणि ग्राहकांना आंबा घरपोच मिळावा यासाठी राज्य कृषी पणन मंडळाद्वारे दरवर्षी आयोजित करण्यात येणारा आंबा महोत्सव यंदा खंडित न करता ऑनलाइन पद्धतीने आयोजित करण्यात आला आहे.

ग्राहकांना संघटितपणे आपली मागणी मंडळाच्या https://www.msamb.com/ या संकेतस्थळावरील Buyer seller information या लिंक द्वारे किंवा bs.msamb.com करावी लागणार आहे. या मागणीनुसार ग्राहकांना थेट आंबा घरपोच मिळणार आहे.

याबाबतची माहिती देताना मंडळाचे व्यवस्थापक दीपक शिंदे म्हणाले, ''कोरोना लॉकडाऊनमुळे ऐन हंगामात आलेला हापूसचा हंगाम धोक्यात आला आहे. यामुळे आंब्याला बाजारपेठ मिळावी आणि ग्राहकांना थेट शेतकऱ्यांकडून रास्त दरात आंबा उपलब्ध व्हावा यासाठी दरवर्षी आयोजित करण्यात येणारा आंबा महोत्सव रद्द करण्यात आला आहे. मात्र प्रत्यक्षात एकाच ठिकाणी होणारा आंबा महोत्सव जरी रद्द झाला असला तरी ऑनलाइन आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी पणन मंडळाच्या संकेतस्थळावर एक पर्याय उपलब्ध करुन देण्यात आला असून या ठिकाणी आंबा उत्पादक शेतकऱ्यांची नोंदणी करण्यात आली आहे. तसेच हा आंबा पुण्यात उपलब्ध करुन देण्यासाठी वखार महामंडळाचे एक गोदाम भाडेतत्त्वावर घेण्यात आले असून, शहरात मुबलक आंबा उपलब्ध होणार आहे.''

नैसर्गिक पद्धतीने पिकविलेला आंबा ग्राहकांना उपलब्ध होण्यासाठी ग्राहकांनी आपल्या गृहनिर्माण संस्थेची एकत्रित कमीत कमी १०० डझनाची मागणी नोंदविणे गरजेचे आहे. एकत्रित मागणीमुळे आंबा घरपोच देणे सोयीचे आणि रास्त दरात उपलब्ध होणार आहे, असे शिंदे यांनी स्पष्ट केले आहे.

# आंब्याचा आस्वाद घ्या आता घरबसल्या!

## लॉकडाऊनमध्ये मिळणार घरपोच; राज्य कृषी पणन मंडाळाचा पुढाकार

**रत्नागिरी : पुढारी वृत्तसेवा**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लॉकडाउनमध्ये सर्वच शेतमाल उत्पादकांबरोबर आंबा उत्पादक शेतकरी संकटात सापडला आहे. यासाठी राज्य कृषी पणन मंडळाने सोशल डिस्टन्सिंगचे पालन करून ग्राहकांपर्यंत फळांचा राजा पोहोचण्याचा मार्ग उपलब्ध केला आहे. आता ऑनलाईन पद्धतीने आंबा घराघरात पोहचणार आहे. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ दरवर्षी आंबा महोत्सव घेते. यंदा देखील महोत्सव खंडित न करता ऑनलाइन खरेदी करता येईल.



महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या www.msamb.com या संकेतस्थळावरील Buyer Seller Information लिंकद्वारे अथवा bs.msamb.com या लिंकद्वारे खरेदीदारांना नोंदणीची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. आंब्याचा हंगाम आता सुरू झाला असून, सोशल डिस्टन्सिंगचे पालन करूनही ग्राहकांपर्यंत फळांचा राजा पोहोचण्याचा मार्ग कृषी पणन मंडळाने उपलब्ध केला आहे. आंब्याची ही देवघेव उत्पादक व ग्राहक अशा दुहेरी पद्धतीने ऑनलाइनमार्गे करता येईल.

### खरेदीसाठी किमान मर्यादा १०० डझन

गुलटेकडी येथील वखार महामंडळाचे गोदाम तात्पुरते साठवणुकीची व्यवस्था म्हणून उपलब्ध केले आहे. आंबा खरेदीकरिता किमान मर्यादा १०० डझन असणार आहे. तसेच आंबा थेट सोसायटीमध्ये पोहोचवता यावा यासाठी वाहन व्यवस्थादेखील उपलब्ध आहे. या सुविधेसाठी ग्राहकांनी कृषी पणन मंडळाच्या पोर्टलवरील माहितीद्वारे खरेदीदार म्हणून नोंदणी केल्यानंतर आपली मागणी एकत्रित नोंदवावी अथवा आंबा उत्पादकांशी संपर्क करून खरेदीसाठी मागणी नोंदवावी, असे आवाहन कृषी पणन मंडळामार्फत करण्यात आले आहे.

कोकणातील उत्पादकांद्वारे हापूस आंबा शहरातील ग्राहकांना उपलब्ध व्हावा यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ दरवर्षी आंबा महोत्सव घेते. तथापि, यंदा कोरोनाच्या प्रकोपामुळे महोत्सवाचे आयोजन अशक्य आहे. उत्पादकांना विक्रीसाठी शहरात यावे लागू नये तसेच शहरातील ग्राहकांनाही घराबाहेर किंवा सोसायटीबाहेर पडावे लागू नये याकरिता उत्पादक ते ग्राहक या दोघांनीही ऑनलाइन पोर्टलद्वारे आंबा खरेदी-विक्रीची माहिती उपलब्ध व्हावी यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाने खरेदीदारांना ऑनलाईन नोंदणीची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.

पोर्टलवर देवगड व रत्नागिरी हापूस आंबा उत्पादकांची नोंदणी सुरू आहे. आंबा उत्पादकांचे नाव, संपर्क क्रमांक, कोणत्या प्रजातीचा आंबा उपलब्ध आहे इ. तपशील उपलब्ध आहे. त्यामुळे पुणे, मुंबई तसेच इतर शहरातील वैयक्तिक ग्राहक अथवा सहकारी गृहनिर्माण संस्था इत्यादी सर्वांना त्याची मागणी नोंदवता येईल.

# राज्यातील २६९ बाजार समित्या सुरु असल्याचा 'पणन'चा दावा

## व्यवहार सुरळीत होण्याबाबत अद्यापही सुसूत्रता नाही

**पुणे (प्रतिनिधी):** कोरोना लॉकडाऊनमध्ये बाजार समित्यांच्या कामकाजात विस्कळीतपणा आला आहे. स्थानिक पोलीस आणि प्रशासनाच्या आदेशामुळे काही बाजार समित्या बंद आहेत. तर काही ठिकाणी अडते, कामगार संघटनांच्या आडमुठेपणामुळे बंद आहेत. मात्र आता स्थानिक पोलीस, महसूल आणि बाजार समिती प्रशासनाने समन्वयाने बाजार समित्या सुरु करण्याच्या भूमिकेमुळे राज्यातील ३०५ बाजार समित्यांपैकी २६९ समित्या सुरु असून ३६ बंद असल्याचे पणन संचालनालयाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

**पान ४ वर** →

*कोरोना लॉकडाऊनमध्ये बाजार समित्या सुरु ठेवण्याची भूमिका शासनाची होती आणि आहे. यासाठी सातत्याने विविध उपाययोजना आणि खबरदारी घेण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना सातत्याने देण्यात आल्या आहेत. मात्र काही ठिकाणी कोरोनाचे वाढते रुग्ण, बाजार समित्या ज्या भागात आहेत. ते भाग हॉटस्पॉट म्हणून स्थानिक प्रशासनाने सिल केल्याने बाजार समित्या बंद आहेत. तर काही ठिकाणी कामगार नसल्याने बंद आहेत.अशा परिस्थितीत वारंवार सूचना करत आहोत. गुरुवारी (ता.१६) ३०५ पैकी २६९ बाजार समित्या सुरु होत्या.*

— **सुनील पवार,** पणन संचालक

Pune, Main
17/04/2020 Page No. 1

सकाळ अॅग्रोवन

# राज्यातील २६९ बाजार समित्या सुरु असल्याचा 'पणन'चा दावा

पान १ वरून

कोरोना लॉकडाऊनमध्ये सामाजिक अंतरासह विविध उपाययोजना आणि खबरदारी घेण्याच्या सूचनांसह बाजार समित्या सुरु ठेवण्याचे आदेश शासनाने दिले होते. मात्र अनेक ठिकाणी स्थानिक पोलीस, महसूल प्रशासनाच्या विसंवादामुळे आणि वेगवेगळ्या आदेशांमुळे बाजार समित्या बंद ठेवण्यात आल्या होत्या. मात्र कोणताही पर्याय न देता बाजार समित्या बंद ठेवल्यामुळे शेतमालाचा उठाव थांबल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले. तर शहरांमध्ये भाजीपाल्याचा तुटवडा झाल्याने ग्राहकांना अव्वाच्या सव्वा दराने भाजीपाला खरेदी करावा लागत आहे.

मात्र, आता लॉकडाऊनमध्ये शहरातील नागरिकांना भाजीपाला मिळत नसल्याने होत असलेल्या कोंडीमुळे कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न उभा राहिला. तर शेतकऱ्यांचा देखील दबाव वाढल्याने अखेर बाजार समित्या टप्प्याटप्प्याने सुरु होऊ लागल्या आहेत. गुरुवारी (ता.१६) राज्यातील ३०५ बाजार समित्यांपैकी २६९ बाजार समित्या सुरु असल्याचा दावा पणन संचालनालयाने केला आहे. तर ३६ बाजार समित्या बंद असल्याचे सांगितले आहे.

दरम्यान, राज्यातील महत्त्वाच्या असलेल्या मुंबई आणि पुणे बाजार समित्यांमधील व्यवहार सुरळीत होत असून, पुणे बाजार समितीचे मुख्य आवार हॉटस्पॉटमुळे बंद असून ४ उपबाजार आजपासून (ता.१६) सुरु झाले आहेत. चार उपबाजारांमध्ये २४८ वाहनांमधून सुमारे साडेपाच हजार क्विंटल भाजीपाल्याची आवक झाली होती.

## बंद असलेल्या बाजार समित्या

अकलूज, करमाळा, कुर्डूवाडी, मंगळवेढा, मोहोळ, पंढरपूर, सोलापूर, भोर, इस्लामपुर, पारनेर, धडगांव, घोटी, कळवण, सुरगणा, कोपरगाव, चांदवड, मालेगाव, मनमाड, नागपूर, सटाणा, उमराणे, शेवगांव, नेवासा, हिंगोली, बीड, कडा, माजलगाव, परळी, पातोडा, वडवणी, अहमदपुर, कळंब, उस्मानाबाद, अंजनगाव सुर्जी, चिखली, मंगरुळपीर

# शेतमाल वाहतुकीसाठी 'किसान रथ' ॲप

## केंद्रीय कृषीमंत्र्यांच्या हस्ते अनावरण ; वाहनधारक-शेतकऱ्यांत महत्वाचा दुवा

**नवी दिल्ली:** लॉकडाऊनच्या काळात शेतमालाची वाहतूक करण्यासाठी मालवाहतूक गाड्यांची माहिती मिळावी यासाठी केंद्रीय कृषीमंत्री नरेंद्रसिंह तोमर यांनी 'किसान रथ' या मोबाईल ॲपचे अनावरण गुरुवारी (ता.१७) येथे केले. या ॲपच्या माध्यमातून व्यापारी, शेतकऱ्यांना शेतमालाची प्राथमिक आणि दुय्यम पातळीवर वाहतूक करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

'किसान रथ' ॲपची निर्मिती नॅशनल इन्फॉर्मेटीक सेंटरने (एनआयसी) केली आहे. या ॲपच्या माध्यमातून व्यापारी आणि शेतकऱ्यांना वाहतुकीसाठी मालवाहतूक गाड्यांची माहिती उपलब्ध होणार आहे. यात प्राथमिक पातळीवर शेतकऱ्यांच्या बांधावरून मंडी किंवा बाजार समित्या, शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या खरेदी केंद्रांवरून आणि गोदामे आदी माल वाहतुकीचा समावेश आहे. दुय्यम पातळीवर मंडी, बाजार समित्यांपासून राज्य अंतर्गत, राज्या-राज्यांमध्ये, प्रक्रिया केंद्रे, रेल्वे स्टेशन, वेअरहाऊस आणि घाऊक व्यापारी आदी माल वाहतुकीचा समावेश आहे.

यावेळी बोलताना केंद्रीय कृषीमंत्री नरेंद्रसिंह तोमर म्हणाले, कि लॉकडाऊनच्या काळात शेतीसंबंधीत कामे ठप्प झाली होती. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतीला सूट दिली त्यामुळे पिकांची काढणी आणि लागवडीची कामे सुरु झाली. आता 'किसान रथ' ॲपमुळे शेतमालाची वाहतूक सुलभ होईल. शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि सहकारी संस्थांना आपल्या मालाची देशभरात कोठेही तेथे वाहतूक करता येणार आहे. शेतकरी आणि व्यापाऱ्यांना बांधावरून ते बाजार समित्यांपर्यंत आणि बाजार समित्यांपासून देशभरात शेतमालाची वाहतूक करता येणार आहे.

वापरकर्ता google play store मध्ये Kisan Rath टाईप करून ॲप डाऊनलोड करता येईल.





नवी दिल्ली : केंद्रीय कृषी मंत्रालयाच्या 'किसान रथ' मोबाईल ॲपचे उद्‌घाटन करताना केंद्रीय कृषिमंत्री नरेंद्रसिंह तोमर.

**श्रेणीनुसार वाहतुक शक्य :** 'किसान रथ' मोबाईल ॲपच्या माध्यमातून शेतमालाच्या श्रेणीनुसार वाहतूक करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अन्नधान्य (तृणधान्य, भरडधान्य, कडधान्य आदी), फळे आणि भाजीपाला, तेलबिया, मसाले, फुले, बांबू, लाकूड, वन उत्पादने नारळ आदी उत्पादनांची वाहतूक सोपी होणार आहे. तसेच व्यापाऱ्यांना नाशिवंत मालाची शीतवाहनाद्वारे वाहतूक करता येईल.

पुढारी

# अडथळ्यांचे काटे ओलांडून गुलाब रोपे लेबनानला निर्यात

## राज्य कृषी पणन मंडळाचे यश

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

कोरोनाच्या पार्श्वभुमीवर लॉकडाऊन असल्याने शेतीमाल निर्यातीतही अडचणी येत आहेत. अशाच एका घटनेत निर्यातीसाठी पाठविलेला गुलाबाच्या रोपांचा ट्रक लोणावळ्याजवळ अडवून पोलिसांनी परत पाठविला. राज्य कृषी पणन मंडळाच्या शेतमाल निर्यात-सनियंत्रण कक्षाने हस्तक्षेप केल्याने एका खासगी कंपनीची सुमारे ३१ हजार गुलाब रोपे लेबनानमधील बैरुत शहराकडे निर्यातीद्वारे पाठविण्यात यश आले आहे.

मावळ परिसरातील सोएक्स फ्लोरा या कंपनीस गुलाब फुलांची निर्यात करावयाची होती. या कंपनीची लॅब आणि पॉलिहाऊस लोणावळ्याजवळ आहे. १६ एप्रिलला कंपनीने गुलाबाच्या रोपांचा ट्रक आवश्यक तपासणीकरिता वाशी येथे कृषी पणन मंडळाच्या व्हेजीटेबल प्रोसेसिंग केंद्राकडे पाठविला होता. तथापि लोणावळ्याजवळ पोलिसांनी हा ट्रक अडवून परत पाठवला. त्यावर कंपनीचे नरेंद्र पाटील यांनी पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक आणि निर्यात-सनियंत्रण कक्षाचे प्रमुख डॉ. भास्कर पाटील यांच्यांशी संपर्क साधला. त्यानंतर त्यांना १७ एप्रिल रोजी गाडी पुन्हा मुंबईकडे पाठविण्यास सांगितले. तसेच गाडीचा नंबर, ड्रायव्हरचे नाव, मोबाईल नंबर आदी तपशिल पाठविण्यास सांगितले. गाडी जेथे अडविली जाईल, तेथून ड्रायव्हरकडून नियंत्रण कक्षास संपर्क करावा व गाडी अडविणाऱ्या अधिकाऱ्यांशी संपर्क करून द्यावा असेही सांगितले.

त्यानुसार गाडी निघाली असता कार्ला येथे पोलिसांनी अडवली. सनियंत्रण कक्षाला माहिती मिळताच पोलिस निरीक्षक शीतल पाटील यांच्याशी संपर्क करण्यात आला. त्यांना सर्व बाजू समजावून सांगून गाडीमध्ये निर्यात होणारा शेतमाल असल्याचे स्पष्ट केले. गुलाब फुले ही निर्यातीसाठी जात असून त्यास अडविणे योग्य नसल्याचे नियंत्रण कक्षातून सांगितले. या संदर्भात शासनाने काढलेल्या आदेशाची प्रत त्यांना व्हॉट्सॲपवर लगेच पाठविली आणि त्यांनी तत्काळ गाडी सोडली. त्यामुळे त्याच दिवशी गुलाबाची रोपे राष्ट्रीय पीक संरक्षण संस्था (एन.पी.पी.ओ.) कुवेतकडे रवाना झाली.

कुवेतमधून ही गुलाब रोपे लेबनानच्या बैरुत शहरात पोहचणार असून, निर्यातीमधील अडचणी सोडविल्याबद्दल कंपनीने पणन मंडळाचे आभार मानल्याची माहिती राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांनी दिली.

# पुणेकरांकडून दहा हजार डझन 'हापूस'ची खरेदी

## राज्य कृषी पणनच्या ऑनलाइन विक्रीस भरघोस प्रतिसाद

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

कोरोना लॉकडाऊन काळात गुलटेकडी मार्केट यार्डातील व्यवहार ठप्प झाल्याने हापूसवरील पुणेकरांचे प्रेम ओसरले की काय अशी शंका येत होती. मात्र, राज्य कृषी पणन मंडळाने हापूस ऑनलाईन खरेदीची संधी उपलब्ध करून दिल्यानंतर त्याला भरभरून प्रतिसाद देत दहा हजार डझन आंब्याची खरेदी करीत आपले हापूस प्रेम लॉकडाऊन काळातही पुणेकरांनी दाखवून दिले आहे.

चवीला गोड, सुवासिक, दर्जेदार व शेतकऱ्यांनी नैसर्गिकरीत्या पिकविलेल्या हापूस आंब्यांची चव आता पुणेकरांच्या जिभेवर लवकरच रेंगाळणार आहे. राज्य कृषी पणन मंडळाच्या पोर्टलद्वारे थेट उत्पादक शेतकऱ्यांकडे मागणी नोंदविलेल्या ग्राहकांना लवकरच सुमारे १० हजार डझन आंबा उपलब्ध करून दिला जात आहे. पणन मंडळाच्या या उपक्रमास यश मिळत आहे.



### ५० लाखांची उलाढाल

५०० रुपये डझनप्रमाणे आंब्यांची विक्री करण्यात आली असून ५० लाख रुपयांची उलाढाल यानिमित्ताने होत आहे. पणन मंडळाच्या या उपक्रमामुळे कोरोनाच्या संकटाच्या पार्श्वभूमीवर आंबा विक्री होऊन शेतकऱ्यांनाही दिलासा मिळाला आहे.

ऑनलाइन पोर्टलवर कोकणातील देवगड व रत्नागिरी हापूस मिळून एकूण ३२५ आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी नोंदणी केलेली आहे. मागील तीन दिवसांत पोर्टलव्दारे ६८ ग्राहकांनी आंबा खरेदी करण्यासाठी नोंदणी केली आहे. पोर्टलवर आंबा उत्पादकांचे नाव, संपर्क क्रमांक, कोणत्या प्रजातीचा आंबा उपलब्ध आहे, आदी तपशील उपलब्ध आहे. त्यामुळे पुणे, मुंबई तसेच इतर शहरातील वैयक्तिक ग्राहक अथवा सहकारी गृहनिर्माण संस्थांना त्यांची मागणी या पोर्टलवर नोंदविता येईल किंवा विशिष्ट आंबा उत्पादकांशी संपर्क करता येऊ शकेल. त्यामुळे आंबा विक्रेता शेतकरी तातडीने कार्यवाही करून शहरातील ग्राहकांना त्यांच्या घरी आंबा पोहोचता करू शकतील. या ऑनलाइन पोर्टलला चांगला प्रतिसाद प्राप्त होत असून आंब्यांच्या मागणीत वाढ होत असल्याची माहिती पणन मंडळाचे सरव्यवस्थापक दीपक शिंदे यांनी दिली.

हापूस उपलब्ध होण्यासाठी काही तांत्रिक अडचणी आल्यास पणन मंडळाचे संगणक व्यवस्थापक विजय जगदाळे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. ते म्हणाले की, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर यंदा पणन मंडळाच्या पुढाकाराने भरविण्यात येणारा आंबा महोत्सव होणार नाही. मात्र, आंबा खरेदीसाठी पणन मंडळाच्या www.msamb.com या संकेतस्थळावरील बायर सेलर इन्फॉरमेशन लिंकद्वारे खरेदीदारांना नोंदणीची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

सकाळ अॅग्रोवन




कोचूर, जि. जळगाव : दिल्लीला केळी रेल्वे वॅगनद्वारे पाठविण्यासाठी केळीची पॅकिंग करताना मजूर. (दुसऱ्या छायाचित्रात) रावेर, जि. जळगाव : रेल्वे स्टेशनवर रेल्वे वॅगनमध्ये केळी भरताना मजूर.

# रावेरची केळी दिल्लीला रवाना

## पणन मंडळाची मदत : २३ टन केळी पोचली आझादपूर मंडीत



**जळगाव (प्रतिनिधी) :** रावेर (जि. जळगाव) येथून अनेक वर्षानंतर रेल्वे वॅगनमधून २३ टन केळीची पाठवणूक दिल्ली येथील आझादपूर बाजारातील व्यापाऱ्यांपर्यंत पोचली आहे. केळी वाहतूक सुकर होण्यास मदत झाल्याने बाजार सावरण्यास मदत होणार आहे.

नुकतीच २३ टन केळीची १५ किलोच्या बॉक्समध्ये पॅकींग करून आझादपूर येथील बाजारात पाठवणूक झाली. तेथील खरेदीदारांकडे ही केळी रविवारी (ता. १९) पोचली. केळीच्या पॅकींगसाठी श्याम फ्रूट कंपनी, सावदा (ता. रावेर) यांची मदत मिळाली. केळी रावेर रेल्वे स्टेशन येथे मालवाहू वॅगन (पार्सल यान) मध्ये भरण्यात आली. ही वॅगन पणन मंडळ, कृषी विभाग यांच्या मदतीने उपलब्ध झाली.

सुमारे ७३ हजार रुपये भाडे या संबंधी संबंधितांना द्यावे लागणार आहे. शेतकऱ्यालाही चांगला दर या उपक्रमामुळे मिळणार आहे. रावेरातून केळीची रेल्वेद्वारे पाठवणूक अनेक वर्षांपासून बंद होती. रेल्वे वॅगनचे अधिकचे भाडे, दंड व इतर कारणांमुळे ही पाठवणूक बंद झाली होती. अलिकडे 'कोरोना'च्या संकटात ट्रकभाडे वधारले आहे. ते खरेदीदार, व्यापाऱ्यांना परवडत नाही. यामुळे केळी दरांवरही दबाव वाढत होता. या स्थितीत खरेदीदार व पणन मंडळाच्या पुढाकाराने रेल्वे वॅगनमधून केळीची पाठवणूक झाली.

दिल्ली येथील आझादपूरच्या बाजारात केळीचा उठाव वाढला तर रेल्वेने केळी पाठवणूक वाढू शकते. निंबोल (ता. रावेर) व इतर भागातील शेतकरी, संस्थादेखील रेल्वेद्वारे केळी पाठविण्यासंबंधी नियोजन करीत असल्याचे सूत्रांनी सांगितले.

> ***केळीची रावेरातून अनेक वर्षानंतर रेल्वे वॅगनमधून पाठवणूक झाली आहे. एका वॅगनचे ७३ हजार भाडे द्यावे लागणार आहे. केळीची काढणी वाहतूक व इतर समस्यांमुळे ठप्प होती. वॅगन उपलब्ध झाल्याने ही वाहतूक सुकर होण्यास मदत मिळाली आहे. पणन मंडळ, कृषी विभागाचे सहकार्य यासाठी मिळाले.***
>
> — **वैभव महाजन,** केळी खरेदीदार, सावदा, ता. रावेर

पुणे, कोल्हापूर, नाशिक, मुंबई, औरंगाबाद, सोलापूर, नागपूर, जळगाव, नांदेड, अकोला येथून प्रसिद्ध

www.agrowon.com
सकाळ
मित्र ग्लोबल शिवाराचा..
अॅग्रोवन



शनिवारी (ता. २५) दुपारी ५.३० वाजता उपग्रहाद्वारे टिपलेले छायाचित्र.

रविवार, २६ एप्रिल २०२० । पाने १२ । किंमत ₹ ३ ।

# सव्वा लाख टन शेतमालाची संनियंत्रण कक्षाद्वारे निर्यात

## द्राक्ष, डाळिंब, हापूस, केळी, कांदा पिकांचा समावेश

**पुणे (प्रतिनिधी): कोरोना टाळेबंदीमुळे स्थानिक तसेच निर्यातीसाठी शेतमालाची पुरवठा साखळी विस्कळीत झाली होती. मात्र राज्य शासनाने शेतमाल निर्यात संनियंत्रण कक्ष स्थापन करुन शेतकरी, निर्यातदार आणि आयातदार यांच्यामध्ये समन्वय साधत समुद्र आणि हवाईमार्गे सुमारे सव्वा लाख टन शेतमालाची यशस्वी निर्यात केली आहे, अशी माहिती कक्षप्रमुख डॉ. भास्कर पाटील यांनी दिली.**

दरम्यान, टाळेबंदीच्या वाढीची दाट शक्यता वर्तविण्यात येत असल्याने निर्यात संनियंत्रण कक्षाची जबाबदारी आणखी वाढविण्यात येण्याची शक्यता देखील वर्तविण्यात येत आहे.

कोरोना टाळेबंदीनंतर शेतमालाची स्थानिक, जिल्हा, राज्य, देशांतर्गत आणि निर्यातीची साखळी खंडीत झाली होती. यामुळे शेतातील उभ्या पिकांचे मोठे नुकसान झाले होते. हे नुकसान कमी करण्यासाठी राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने पणन मंत्री बाळासाहेब पाटील, पणन सचिव अनुपकुमार, पणन मंडळाचे कार्यकारी संचालक आणि पणन संचालक सुनील पवार यांच्या समन्वयातून स्थानिक, जिल्हा आणि आंतरराज्य शेतमाल पुरवठा साखळी पुर्ववत करण्यासाठी विविध उपाययोजना केल्या. पान ४ वर

**या देशांमध्ये झाली निर्यात** : सौदी अरेबिया, दुबई, कुवेत, बहारीन, ओमान, कतार, इराण, श्रीलंका, अफगाणिस्तान, चीन, बांगलादेश, मॉरीशस, जर्मनी, इग्लंड



**शेतमालाची निर्यात** (टनांत)

| शेतमाल | निर्यात |
|---|---|
| द्राक्ष | ४,१४० |
| आंबा | २,२३५ |
| केळी | ११,५२० |
| कांदा | एक लाख |
| डाळिंब | ३६३ |
| इतर भाजीपाला | १०,६०० |

# अक्षयतृतीयेला आंब्याचा 'ऑनलाईन गोडवा'

## सोसायटीत मागविला जातोय आंबा । पणन मंडळ-खासगी व्यापाऱ्यांनी दिली सुविधा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे : कोरोनाचा** प्रसार रोखण्यासाठी शटडाऊन असल्याने सर्वच बाजारपेठा बंद आहे. अक्षयतृतीयेला आंब्याचा गोडवा चाखता यावा यासाठी पणन मंडळासह काही व्यापाऱ्यांनी ऑनलाईन मागणी नोंदवित आंबा वितरणाची साखळी उभारली आहे. त्यामुळे यंदाच्या सणाला ऑनलाईन गोडवा प्राप्त झाला आहे.

आंबा आणि अक्षयतृतीया असे समीकरण आहे. यादिवशी घरी आमरसाचा बेत करण्याची प्रथा पडली आहे. त्यामुळे दर वर्षी अक्षयतृतीयेच्या आधी आठवडाभर आंब्याला मोठी मागणी असते. गुलटेकडी, मार्केट यार्ड, पणन मंडळ आंबा महोत्सव आणि राज्यभरात विविध ठिकाणी 'शेतकरी ते थेट ग्राहक' असे महोत्सव राबविण्यात येतात. यंदा देशातील व्यवहार ठप्प असल्याने आंध्र प्रदेश आणि केरळातून होणारी आंब्याची आवक यंदा अजिबातच झाली नाही. कर्नाटकातून जेमतेम आवक होत असून, रत्नागिरी आणि देवगडवरुन तुलनेने अधिक आंबा शहरात येत आहे. पणन मंडळाने शेतकरी आणि ग्राहकांची थेट भेट घडवून आणण्यासाठी ऑनलाईन पर्याय दिला आहे, तर काही व्यापाऱ्यांनी ऑनलाईन सेवा पुरविणाऱ्या कंपन्यांबरोबर संपर्क साधत आंबाविक्रीची साखळी तयार केली आहे.

याबाबत माहिती देताना पणन मंडळाच्या ऑनलाईन आंबा वितरण प्रणालीचे समन्वयक मंगेश कदम म्हणाले, की आंबा वितरणासाठी पणन मंडळाने बीएस डॉट एमएसएमबी डॉट कॉम हे संकेतस्थळ तयार केले आहे. त्यावर ग्राहक आणि विक्रेत्यांना नोंदणी करता येते. त्या माध्यमातून एकाचवेळ २५ डझन अथवा ५ ते दहा पेट्यांची एकत्रित मागणी नोंदविता येते. एखादी गृहसंस्था अथवा सोसायटीमध्ये एकाचवेळी मागणी नोंदवून आंबा मागविता येत आहे. आत्तापर्यंत जवळपास १५ हजार डझन आंब्याचे वितरण या माध्यमातून करण्यात आले आहे. आंब्याला प्रतिडझन ५०० ते ९०० रुपये दर मिळत आहे.





### थेट ग्राहकांना वितरण

१ मार्केट यार्डातील आंबाविक्रेते रोहन उरसळ म्हणाले, की घाऊक विक्री बंद असल्याने थेट ग्राहकांना आंबा वितरीत करण्यात येत आहे. आंध्र प्रदेश आणि केरळातून आंबा महाराष्ट्रात आलाच नाही. कर्नाटकमधून क्षमतेच्या जेमतेम दहा टक्के आंबा राज्यात येत आहे.

२ सध्या देवगड आणि रत्नागिरीतून जास्त आवक होत आहे. ऑनलाइनच्या माध्यमातून ग्राहकांना सहा नग, एक आणि दोन डझन आंब्याची विक्री करीत आहे. आंब्याच्या वजनानुसार ८00 ते १३00 रुपये प्रतिडझन भाव आहे. त्यासाठी पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधे दहा विविध ठिकाणी वितरण केंद्रे सुरु केली आहेत.

लोकमत

# कोरोनात ई-नामद्वारे एप्रिलमध्ये शेतमालाची ३० कोटींची उलाढाल

## शेतकऱ्यांची निराशा; मार्चच्या तुलनेत केवळ २0 टक्केच खरेदी

योगेश बिडवई । लोकमत न्यूज नेटवर्क




**ई-नाम व्यवहार**

| महिना | खरेदी (क्विंटल) | उलाढाल (कोटी रुपये) |
|---|---|---|
| मार्च | ६ लाख | १७२ |
| एप्रिल | १ लाख | ३0 |

> शेतमालाचे व्यवहार सुरु ठेवण्यासाठी बाजार समितीसह इतर घटकांशी समन्वय ठेवला जात आहे. शेतमालाच्या खरेदीत ई-नाम व्यवस्थेत मर्यादा येतात. त्यामुळे शेतकरी कंपन्यांमार्फत शेतमाल थेट ग्राहकापर्यंत पोहोचविण्याचे काम केले जात आहे. पणन मंडळातर्फे निर्यातीला प्रोत्साहन दिले जात आहे.
>
> **- बाळासाहेब पाटील**, पणनमंत्री

**मुंबई** : कोरोनाच्या संकटात विविध निकषांमुळे कृषी उत्पन्न बाजार समित्यांमधील शेतमालाचे व्यवहार मोठ्या प्रमाणात प्रभावित झाले असून केंद्र सरकारचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेली ऑनलाईन राष्ट्रीय कृषी बाजार व्यवस्थेचीही शेतकऱ्यांना विशेष मदत झाली नसल्याचे स्पष्ट झाले आहे. मार्च महिन्यात ई-नामच्या व्यासपीठाद्वारे महाराष्ट्रात तब्बल १७२ कोटींची उलाढाल झाली होती. लॉकडाउनमुळे एप्रिल महिन्यात ई- नामद्वारे केवळ ३० कोटी रुपयांच्या शेतमालाची खरेदी झाली आहे.

राज्यातील ३०५ बाजार समित्यांपैकी ६० बाजार समित्यांमध्ये ई-नाम प्रणाली कार्यरत आहे. ई-नामद्वारे मार्च महिन्यात ६ लाख क्विंटल मालाची खरेदी झाली. २३ मार्चनंतर राज्यात लॉकडाउन झाले. त्यानंतर शेतमालाचे व्यवहार थंडावले. त्याचा ऑनलाईन बाजारावरही परिणाम झाला. एप्रिल महिन्यात २५ तारखेपर्यंत राज्यात एक लाख क्विंटल शेतमालाची खरेदी झाली. त्याची उलाढाल केवळ ३० कोटी होती. मार्चच्या तुलनेत एप्रिलमध्ये केवळ २० टक्के व्यापार झाला, अशी माहिती राज्य कृषी पणन मंडळाने लोकमतला दिली.



# दोनशे मेट्रिक टन केळींची निर्यात

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोल्हापूर तसेच सांगली जिल्ह्यातून २०० मेट्रिक टन केळींची परदेशी निर्यात करण्यात आली आहे. दुबई, मस्कत, इराण व इराक या देशांमध्ये ही केळी निर्यात करण्यात आली आहेत. याबाबत शेतकऱ्यांनी प्रशासनाचे पत्राद्वारे आभार मानले आहेत.

काढणी, ग्रेडिंग, पॅकिंग व वाहतुकीसाठी मजुरांची आवश्यकता असते. मजुरांच्या स्थलांतरास तसेच वाहतुकीस परवानगी नसल्याने लॉकडाऊनमध्ये केळी निर्यातीमध्ये अडचण निर्माण झाली होती. शेतकऱ्यांनी कृषी पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक सुभाष घुले यांची भेट घेऊन निर्याती मधील अडचणी सांगितल्या.

## जिल्हा प्रशासन-कृषी पणन मंडळाचा पुढाकार

अडचणी संदर्भात त्यांनी अपेडाचे प्रशांत वाघमारे, पणन संचालक सुनील पवार, पणन मंडळाचे सरव्यवस्थापक दीपक शिंदे यांचे मार्गदर्शन घेऊन जिल्हा प्रशासनासोबत चर्चा केली.

जिल्हाधिकारी दौलत देसाई यांनी यामधून मार्ग काढत केळी निर्यातीमधील येणाऱ्या अडचणी सोडविण्यास मदत केली. जिल्हा प्रशासनाच्या सहकार्यामुळे आणि कृषी पणन मंडळाच्या पुढाकाराने कोल्हापूर जिल्ह्यातील भादोले आणि सांगली जिल्ह्यातील आष्टा, बावची व कासेगाव भागातील केळी उत्पादकांची केळी निर्यात होण्यास मदत झाली. लॉकडाऊनमुळे स्थानिक बाजारपेठेत केळीचे दर रुपये अडीच ते तीन रुपये प्रती किलोपर्यंत खाली आले होते. मात्र, निर्यातीच्या माध्यमातून केळी उत्पादकांना निर्यातदार कंपनीकडून रुपये सहा ते सात रुपये प्रती किलो दर मिळाला.

लोकमत

# कोरोना दरम्यान आणि कोरोना नंतर...

देशात व राज्यात गेल्या काही दिवसांपासून उद्भवलेल्या कोरोनाच्या गंभीर पार्श्वभूमीवर जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा सुरु ठेवणे हे फार मोठे आव्हान होते. एका बाजूला फिजिकल डिस्टंसिंगचे पालन करणे, सॅनिटायझरचा वापर करणे, तोंडाला मास्क लावून वावरणे आणि गर्दी होऊ न देता सर्व व्यवहार करणे हे खूप आव्हानात्मक होते. बहुतांश शेतमालाचा समावेश जीवनावश्यक वस्तूमध्ये होत असल्याने व शेतकरी हितासाठी पणन विभागाने सुरुवातीपासून कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे कामकाज सुरु ठेवण्याचा धोरण स्वीकारले.

३०५ पैकी राज्यामध्ये सातत्याने कार्यरत असलेल्या सर्वसाधारण २६०-२७० बाजार समित्या असल्या तरी पहिल्या टप्प्यात विशेषकरून भाजीपाला व अन्नधान्याचे व्यवहार करणाऱ्या बाजार समित्या सुरु ठेवाव्यात आणि काही काळासाठी गुराढोरांचे बाजार व इतर जीवनावश्यक नसलेल्या वस्तुंचे व्यवहार बंद असले तरी चालण्या जोगे होते जेणेकरून कमीत कमी लोक घराबाहेर पडतील अशी धारणा होती.

कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये कार्यरत मोठ्या संख्येतील बाजार घटक उदा. शेतकरी, वाहन चालक, क्लिनर्स , खरेदीदार व्यापारी, हमाल-माथाडी, वजनमाप करणारे मापारी, घाऊक खरेदीदार, मदतनीस, दिवाणजी, कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे अधिकारी-कर्मचारी वर्ग, सुरक्षारक्षक यांचा ताळमेळ सांभाळून बाजार समित्यांपुढे कोरोना विषाणू प्रतिबंधक उपाययोजनांचे पालन करून व्यवहार चालू ठेवणे हे मोठे आव्हानाचे काम होते. कोवीड-19 ची परिस्थिती ही संपासारखी नसल्याने संप मोडून काढुन बळपूर्वक समित्यां सुरु करणे अजिबात अपेक्षित नव्हते. या विषाणुचा प्रादूर्भाव प्रत्येक व्यक्तीला शक्य असल्याने शेतकऱ्यांसह प्रत्येक बाजार



घटकांच्या जीवन-मरणाशी संबंधित असल्याने या सर्व घटकांचा विचार करुनच त्यांना वेळोवेळी शासनामार्फत मार्गदर्शन करुन आवाहन करून व संपूर्ण दक्षता घेऊनच बाजार समित्यांचे कामकाज सुरु ठेवणे आवश्यक होते. यामध्ये राज्यात बऱ्यापैकी यश मिळाल्याचे दिसून येते. अनेक जिल्ह्यातील महसूल विभाग, पोलीस यंत्रणा, महानगरपालिका इत्यादींनी बाजार समित्या चालू किंवा बंद ठेवणेबाबत वेगवेगळ्या भूमिका स्विकारल्याने लॉकडाऊनच्या पहिल्या टप्प्यात शेतकऱ्यांना नक्कीच काही प्रमाणात त्रास सहन करावा लागला.

कृषि उत्पन्न बाजार समित्या या घाऊक व्यवहार करणारी केंद्रे असून, तेथे व्यवहार झालेनंतर भाजीपाला व अन्नधान्याचा पुरवठा ग्राहकापर्यंत किरकोळ प्रमाणात करण्यासाठी अनेक यंत्रणा उदा. ब वर्ग खरेदीदार, वाहतूकदार, महानगरपालिका/ नगरपालिका यांचे अखत्यारीतील भाजीबाजार, किरकोळ विक्री केंद्रे तसेच अन्न व नागरी पुरवठा विभाग यांचा महत्त्वाचा सहभाग महत्त्वाचा असतो. तथापि लॉकडाऊनमध्ये कृषि उत्पन्न बाजार समित्यांमधील घाऊक बाजारानंतरची पुढिल सर्व पुरवठा साखळी विस्कळीत झाल्याने



सुनील पवार
पणन संचालक तथा कार्यकारी संचालक, राज्य कृषी पणन मंडळ, पुणे

किरकोळ ग्राहकांनी थेट बाजार समित्यामध्ये धाव घेऊन खरेदीदासाठी गर्दी केल्याने बाजार समित्यांमध्ये गर्दीवर नियंत्रण ठेवणे हे आव्हान ठरले होते. ग्राहक घाबरुन मोठ्या प्रमाणात करीत असलेली खरेदी (पॅनिक बाईंग) एक प्रमुख समस्या होती. मात्र राज्य शासनाच्या सततच्या मार्गदर्शनामुळे फिजिकल डिस्टंसिंग ठेवणे, टनेल स्प्रेची व्यवस्था करणे, हॅण्ड सॅनिटायजर व मास्क पुरवठा, बाजार आवारातील स्वच्छता या बाबी बाजार समित्यांनी सुरु केल्या . प्रचार फलक आणि लाऊडस्पीकरवरील उद्घोषणा देखील महत्त्वाच्या ठरल्या.

बाजार आवारातील गर्दी टाळण्यासाठी टोकन पध्दतीचा अवलंब करणे, पूर्व नोंदणी केल्या शिवाय माल विक्रीस न आणणे जेणेकरुन वाहनांची संख्या मयार्दीत ठेवणे तसेच विशिष्ट दिवशी विशिष्ट शेतमालाचा लिलाव करणे किंवा वाहनांची गर्दी टाळण्यासाठी सदर वाहनांची नोंदणी करुन ती व्यापाऱ्याकडे पाठविणे या उपाययोजनांमुळे बाजारातील गर्दी नियंत्रीत ठेवण्यात बाजार समित्यांना चांगले यश मिळाले आहे.

राज्यातील अन्नधान्य व इतर बिगर नाशवंत मालाला जरी फारशी अडचण आली नसली तरी फळे व भाजीपाला या उत्पादनांना परराज्यातून असलेली मागणी मोठ्या प्रमाणात कमी झाल्याने शेतकऱ्यांना अडचणीचा सामना करावा लागला. मात्र हळूहळू उत्तर भारतात आझादपुर सारख्या मोठ्या बाजार समित्या सुरु झाल्याने कांदा, केळी व इतर शेतमाल रवाना होवू लागला असून, रेल्वे, पोस्टखात्याची वाहने इ. मार्गानें केळी, आंबा परराज्यात जाण्याची व्यवस्था झाली आहे. निर्यातविषयक कामकाजावरही लक्ष केंद्रीत केल्याने जे. एन. पी. टी, मुंबई येथून आंबा, कांदा, केळी व भाजीपाला याच्या नियार्तीने वेग घेतला आहे.

कोरोना प्रादुभार्वाच्या पार्श्वभूमीवर कृषि पणन क्षेत्रात धडा घेण्याजोग्या अनेक बाबी घडल्या असून,गांभीयार्नें लक्ष देणे गरजेचे आहे. खाजगी बाजार सुरु करण्यात आले तसेच थेट पणन परवाने, एकल परवाने मोठ्या प्रमाणात राज्य सरकारने वितरीत केले. याचा फायदा बड्या उद्योग समुहांनी व व्यापारी वर्गाने घेतला. सध्याच्या अडचणीच्या काळात बहुतांश प्रचलित बाजार समित्यांनीच कामकाज केले आणि म्हणूनच यापुढे शेतकऱ्यांचे गट, शेतकरी उत्पादक कंपन्या यांनी खाजगी बाजार स्थापन करणे, थेट पणन परवाना घेणे यासाठी मोठ्या प्रमाणात पुढे येण्याची आवश्यकता आहे.

# थेट पणनसाठी शेतकऱ्यांनीच पुढे यावे



सुनील पवार

**कोरोना टाळेबंदीमध्ये शेती आणि पणन क्षेत्राला बसललेल्या फटक्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असले, तरी नुकसानीची तिव्रता कमी करण्यासाठी पणन विभागाने विविध प्रयत्न केले आहेत. तसेच आता कोरोनानंतर करावयाच्या उपयायोजनांसाठीही प्रयत्न सुरु आहेत. कोरोना टाळेबंदीमध्ये धडा घेण्याजोग्या अनेक बाबी घडल्या असून, भविष्यात या बाबींकडे सर्वांनी गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे.**




कृषि उत्पन्न बाजार समित्यांना पर्याय म्हणून खाजगी बाजार सुरू करण्यात आले तसेच थेट पणन परवाने, एकल परवाने मोठ्या प्रमाणात राज्य सरकारने वितरीत केले. याचा फायदा बड्या उद्योग समुहांनी व व्यापारी वर्गाने घेतला मात्र सध्याच्या अडचणीच्या काळात बहुतांश प्रचलित बाजार समित्यांनीच कामकाज केल्याचे दिसून आले आणि म्हणूनच यापुढे शेतकऱ्यांचे गट, शेतकरी उत्पादक कंपन्या यांनी खाजगी बाजार स्थापन करणे, थेट पणन परवाना घेणे यासाठी मोठ्या प्रमाणात पुढे येण्याची आवश्यकता आहे. प्रचलित बाजार समित्यांना पर्याय निर्माण करताना दोन्हीकडील घटक हे जर एकच असतील तर शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने पर्याय उपलब्ध होणार नाहीत याची नोंद घेतली गेली पाहिजे.

कोरोना विषाणूजन्य रोगाच्या प्रादूर्भावाच्या या काळात अनेक पुरवठा साखळीत काम करणाऱ्या कॉर्पोरेट कंपन्यांनी त्यांच्याकडील कामगार वर्ग निघून गेल्याचे तसेच मालवाहतूकीच्या अडचणीचे कारण देवून काम बंद केले. मात्र सुरुवातीच्या अत्यंत आणीबाणीच्या काळात शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ, कृषि विभाग यांनीच अहोरात्र काम करून शहरी भागात थेट फळे व भाजीपाला पुरवठा साखळी प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न केले आणि संकट काळात भारतीय नागरीक व प्रशासन यांचे प्रशासकीय कौशल्य व कार्यक्षमता अत्युच्च असते हे पुन्हा दाखवून दिले. तथापि या संकटाचा संधी म्हणून वापर करून घेताना पुरवठा साखळीचे कामकाज हे या संकट काळापुरतेच मर्यादीत न ठेवता कायमस्वरुपी व स्थायी साखळी निर्माण करावी लागेल, जेणेकरुन शेतकरी व ग्राहक यांच्यामध्ये नेहमीचा संपर्क निर्माण होवून त्यांना मध्यस्थांवर अवलंबून राहण्याची आवश्यकता पडणार नाही. यांसाठी शेतकरी संघ /गट यांनी गांभीर्याने लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. सह्याद्री शेतकरी उत्पादक कंपनी, नाशिक यांचे या संदर्भातील कामकाज आदर्शवत असून, या संकल्पनेवर त्यांनी कोरोना संकट येण्यापूर्वीच सुरुवात केली होती हे विशेष! महाराष्ट्र राज्यात सन २०१६ मध्ये फळे व भाजीपाला नियमन मुक्त झाला आहे. त्याची विक्री कृषि उत्पन्न बाजार समितीच्या बाहेर करता येते. तथापि आजही अनेक भाजीपाला व फळे उत्पादक त्यांच्या मालाच्या विक्रीसाठी कृषि उत्पन्न बाजार समित्यांवरच अवलंबून असल्याचे दिसून येते. म्हणजेच कायदा दुरुस्ती होऊनही त्याचा म्हणावा तसा फायदा उत्पादकांनी घेतला नाही. म्हणूनच फळे व भाजीपाला उत्पादकांच्या संघांनी तातडीने यांवर कामकाज सुरु करुन ऑनलाइन किंवा प्रत्यक्ष पुरवठा करणाऱ्या शाश्वत साखळ्या निर्माण करणे आवश्यक आहे.



**थेट भाजीपाला विक्री केंद्रांना शहरी ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळतो आहे.**

द्राक्षांसारखा शेतमाल कोरोनाचे संकट येईपर्यंत बऱ्याच प्रमाणात निर्यात झाला होता. तथापि उर्वरित द्राक्षाच्या मार्केटींगसाठी सुद्धा अनेक अडचणी निर्माण झाल्या. वास्तविक द्राक्षे किंवा जळगांव मधील केळी या सारखा शेतमाल गेली अनेक वर्षांपासून बाजार समित्यांमध्ये विक्रीसाठी येत नाही व त्याच्या मार्केटींगची स्वतंत्र व्यवस्था बाजार समित्यांचे बाहेर निर्माण झालेली आहे. मात्र देशातील इतर भागामध्ये मोठ्या प्रमाणात मागणीत घट झाल्याने व शेतकऱ्यांच्या माल वाहतुकीस पहिल्या टप्प्यात आलेल्या अडचणींमुळे या तुलनेत चांगली विक्रीची साखळी असलेल्या शेतमालाच्या मार्केटींगमध्येही अडचणी निर्माण झाल्या होत्या याचाही विचार करायला पाहिजे. येणाऱ्या काळात रस्ते वाहतूक करण्यापेक्षा तुलनेने केवळ २५ ते ३० टक्के खर्चात होणाऱ्या रेल्वे वाहतुकीला प्राधान्य देणे, परराज्यात शेतमालानिहाय ॲग्रीगेशन सेंटर्स उभारुन त्याद्वारे शेतमालाचे वितरण आजुबाजुच्या भागात करणे या प्रकारचा विचार आता गांभीर्याने करावा लागेल.

कृषिमालाच्या प्रक्रियेचे अत्यल्प प्रमाण नाशवंत शेतमालाच्या विक्री व्यवस्थेत मोठ्या प्रमाणात अडचणीचे ठरते. यास्तव त्या त्या शेतमालाच्या क्लस्टर्स मध्ये संबंधित शेतमाल प्रक्रिया उद्योग निर्माण करणे अत्यावश्यक आहे. उदा. टोमॅटो उत्पादक भागात टोमॅटो सॉस, केचप इ. प्रक्रिया उद्योग , द्राक्ष उत्पादक पट्ट्यात बेदाणे, वाईन इ. उभारणे. तसेच संकटाच्या काळात अथवा ज्यावेळी बाजारभाव कमी असतात त्या काळात शेतमाल साठवणुकीसाठी शासकीय यंत्रणांबरोबरच शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या यांनी पुढे येवून शीतगृहे, गोडावून, प्राथमिक प्रक्रिया केंद्र उभारणी करण्याची गरज आहे. अंतिमतः उत्पादक शेतकऱ्यांनी संघटीत होणे, आपला माल प्रक्रिया करणे, साठवणूक करणे या मार्गाचा अवलंब करुन पाहिजे तेव्हाच परवडेल अशा किंमतीस शेतमाल विक्रीची निर्णयक्षमता शेतकऱ्यांत येणे गरजेचे आहे.

कोरोनाचा प्रादूर्भाव व त्यानंतर येणाऱ्या आर्थिक मंदीच्या पार्श्वभूमीवर अनेक देश अन्नधान्याचा अतिरिक्त साठा करून ठेवत असल्याच्या बातम्या येत आहेत, हे लक्षात घेता शेतकऱ्यांनी त्यांच्याकडील बिगर नाशवंत माल शक्य झाल्यास विक्री न करता राखून ठेवल्यास त्यांना नजीकच्या काळात अधिकचा मोबदला मिळण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. हे मात्र या संकटकाळातील दिलासा देणारे वृत्त आहे.

✆ : ९५४५५५२८८०

**(लेखक पणन संचालक आणि राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक आहेत.)**

लोकमत

## हापूसचीही विदेशवारी : लॉकडाउनमध्ये ३७५ कोटींची कांदा निर्यात

# अडीच लाख टन शेतमाल निर्यात

योगेश बिडवई ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कोरोनाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या लॉकडाउनमुळे जगभरातील उद्योग-व्यवसाय ठप्प झाले असताना एप्रिल महिन्यात महाराष्ट्रातून विक्रमी ३७५ कोटींची कांदा निर्यात झाली आहे. एवढेच नव्हे कोकणचा राजा हापूस आंब्याची चार हजार मेट्रिक टन निर्यात झाली. राज्य शासनाच्या कृषी पणन मंडळाने स्थापन केलेल्या शेतीमाल निर्यात सनियंत्रण कक्षाच्या समन्वयामुळे एप्रिलमध्ये तब्बल २ लाख ३० हजार ५६५ मेट्रिक टन शेतमालाची निर्यात झाली आहे.

बहुतांश देशात विमान सेवा बंद असताना गेल्या वर्षीच्या तुलनेत ही निर्यात केवळ १५ हजार मेट्रिक टन कमी आहे. कांद्याची १ लाख ७० हजार मेट्रिक टन कांदा निर्यात झाली. यंदा आंबा हंगाम उशीरा सुरु झाला. त्यातच कोरोनाचे संकट आल्याने उत्पादक अडचणीत आले. मात्र आंबा निर्यातीमुळे बागायतदारांना काहीसा दिलासा मिळाला. निर्यातीमुळे स्थानिक बाजारपेठेत भाव मिळण्यासही मदत झाली आहे.



### केळीची विक्रमी निर्यात

गेल्यावर्षीच्या तुलनेत सुमारे सात हजार टन अधिक म्हणजे २२ हजार ५00 टन केळी निर्यात झाली. द्राक्षनिर्यातीनेही सात हजार टनाचा टप्पा गाठला. लिंबुची तर जवळपास चार पट म्हणजे ४४५ टन निर्यात झाली. नारळालाही चांगली मागणी आहे. भाजीपाल्याचीही एक हजार टन अधिक म्हणजे ८२0१ टन निर्यात झाली.



### रमजानमुळे फळांना मागणी

रमजान महिना सुरु झाल्याने मध्य-पूर्व देशांमधून फळे व भाजीपाल्याला चांगली मागणी आहे. त्यामुळे कोरोनाचा फळांच्या निर्यातीवर फारसा परिणाम झालेला नाही. द्राक्षे, टरबुज, खरबुज, डाळिंब, केळी आदी फळांची मे अखेरपर्यंत निर्यात सुरु राहील.

### मसाल्यांना पसंती

भारतातील मसाले युरोप व आखाती देशांमध्ये लोकप्रिय आहेत. एप्रिलमध्ये मिरचीची निर्यात ३00 टनाने वाढून एक हजार टन झाली. बटाटे, आले, लसूण, मसाल्याच्या पदार्थांनाही पसंती आहे.

> सर्व जगालाच पुढचा काही काळ कोविड-१९ सोबत जगावे लागणार आहे. मात्र या संकटात कृषी व पणन विभागाने अडचणींवर मात करत शेतमाल निर्यातीची युरोप व आखाती देशांतील संधी साधली आहे. आपल्या शेतकऱ्यांनी जागतिक दर्जाचे शेतमाल उत्पादन करण्याबरोबरच कोरोनाच्या निकषांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे तंत्र आत्मसात केले आहे. पणन विभागामार्फत निर्यातदारांना सर्व सुविधा देण्यात येत आहे. सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांना मिळालेले हे यश आहे.
>
> **- अनुप कुमार**, प्रधान सचिव, पणन विभाग



फळे-भाजीपाला निर्यात

| शेतमाल | एप्रिल २०१९ (मे.टन) | एप्रिल २०२० (मे.टन) |
|---|---|---|
| कांदे | १,७६,७४३.२ | १,६९,५३३ |
| द्राक्षे | ८,८३६.३५ | ६,९६१.५४ |
| आंबा | ९९९४.३ | ४११८.४ |
| केळी | १५५७६.९ | २२३९४.४ |
| इतर फळे | ४०३७.५ | ३६६६.४ |
| भाजीपाला | ७,०४८ | ८,२०१ |

लोकमत

# कोरोना : कृषी पणन क्षेत्रापुढील आव्हाने व संधी

## दृष्टिकोन

सुनील पवार । पणन संचालक, महाराष्ट्र राज्य

**'लॉकडाऊन'मध्ये** बहुतेक सेवा बंद ठेवण्यात आल्या. मात्र, जीवनावश्यक वस्तूंच्या पुरवठ्यासाठी शेतमालाच्या व्यवहारास सूट दिली. कृषी उत्पन्न बाजार समित्या घाऊक व्यवहार करणारी केंद्रे असून, तेथे व्यवहारानंतर भाजीपाला व अन्नधान्याचा पुरवठा ग्राहकांपर्यंत किरकोळ प्रमाणात करण्यासाठी अनेक घटकांचा सहभाग महत्त्वाचा असतो. तथापि, लॉकडाऊनमध्ये बाजार समित्यांमधील घाऊक बाजारानंतरची पुरवठा साखळी विस्कळीत झाल्याने किरकोळ ग्राहकांनी थेट बाजार समित्यांमध्ये जाऊन खरेदीसाठी गर्दी केल्याने गर्दीवर नियंत्रण ठेवणे आव्हान ठरले होते. ग्राहक घाबरून मोठ्या प्रमाणात करीत असलेली खरेदी (panic buying)देखील एक प्रमुख समस्या होती. मात्र, शासनाच्या मार्गदर्शनामुळे सोशल डिस्टन्स, हँड सॅनिटायझर व मास्क पुरवठा, आदी बाबी बऱ्याच बाजार समित्यांनी सुरु केल्या.

गर्दी टाळण्यासाठी टोकन पद्धतीचा अवलंब करणे, पूर्वनोंदणीशिवाय माल विक्रीस न आणणे, विशिष्ट दिवशी विशिष्ट शेतमालाचा लिलाव करणे किंवा वाहनांची गर्दी टाळण्यासाठी वाहनांची नोंदणी करून ती व्यापाऱ्याकडे पाठविणे या उपाययोजनांमुळे बाजारातील गर्दी नियंत्रित ठेवण्यात बऱ्यापैकी यश आले. राज्यातील अन्नधान्य व इतर बिगर नाशवंत मालाला फारशी अडचण आली नसली, तरी फळे व भाजीपाल्याला परराज्यांतून असलेली मागणी कमी झाल्याने शेतकऱ्यांना अडचणीचा सामना करावा लागला. उत्तर भारतात आझादपूरसारख्या मोठ्या बाजार समित्या सुरु झाल्याने कांदा, केळी व इतर शेतमाल रवाना होऊ लागला असून, रेल्वे, पोस्टखात्याची वाहने, आदी मार्गाने केळी, आंबा परराज्यांत जाण्याची व्यवस्था झाली आहे. निर्यातीनेही वेग घेतला आहे.

दुसऱ्या बाजूला कोरोनाच्या पार्श्वभूमीवर कृषी पणन क्षेत्रात धडा घेण्याजोग्या अनेक बाबी घडल्या. भविष्यात याकडे सर्वांनी गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. मध्य प्रदेश सरकारने काही बाजार सुधारणा केल्या असून, त्याची चर्चा सुरु आहे. मात्र, महाराष्ट्रात यापैकी बहुतांश सुधारणा अनेक वर्षांपूर्वीच झाल्या आहेत. राज्यात कृषी उत्पन्न बाजार समित्यांना पर्याय म्हणून खासगी बाजार सुरु केले तसेच थेट पणन परवाने, एकल परवाने सरकारने वितरित केले. याचा फायदा बड्या उद्योगसमूहांनी व व्यापारीवर्गाने घेतला. मात्र, सध्याच्या अडचणीच्या काळात बहुतांश प्रचलित बाजार समित्यांनीच कामकाज केल्याचे दिसून आले व म्हणूनच यापुढे शेतकऱ्यांचे गट, शेतकरी उत्पादक कंपन्या यांनी खासगी बाजार स्थापन करणे, पणन परवाना घेऊन बाजार कायदा सुधारणांचा लाभ घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात पुढे येण्याची आवश्यकता आहे.

प्रचलित बाजार समित्यांना पर्याय निर्माण करताना या पर्यायी व्यवस्थेतील नियंत्रक एकच असेल, तर शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने लाभ उपलब्ध होणार नाहीत हे लक्षात घेऊन पुढे जावे लागेल. कोरोना प्रादुर्भावाच्या प्रारंभी अनेक पुरवठा साखळीत काम करणाऱ्या कॉर्पोरेट कंपन्यांनी कामगारवर्ग निघून गेल्याचे तसेच मालवाहतुकीच्या अडचणीचे कारण देऊन काम करण्यास असमर्थता दर्शविली. मात्र, या काळात शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या, राज्य कृषी पणन मंडळ, सहकार विकास महामंडळ, कृषी व पणन विभाग यांनीच अहोरात्र काम करून शहरी भागात थेट फळे व भाजीपाला पुरवठा साखळी प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न केले. संकट काळात भारतीय नागरिक व प्रशासन यांचे प्रशासकीय कौशल्य व कार्यक्षमता अत्युच्च असते हे पुन्हा दाखवून दिले. तथापि, या संकटाचा संधी म्हणून वापर करून घेताना पुरवठा साखळीचे कामकाज कायमस्वरूपी व स्थायी साखळी निर्माण करावी लागेल, जेणेकरून शेतकरी व ग्राहक यांच्यात नेहमी संपर्क निर्माण होऊन त्यांना मध्यस्थांवर अवलंबून राहण्याची गरज पडणार नाही. यासाठी शेतकरी गटांनी गांभीर्याने लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. सह्याद्री शेतकरी उत्पादक कंपनी, नाशिक यांचे यासंदर्भातील कामकाज आदर्शवत असून, या संकल्पनेवर त्यांनी कोरोना संकट येण्यापूर्वीच सुरुवात केली होती हे विशेष.

राज्यात २०१६ मध्येच फळे व भाजीपाला नियमनमुक्त झाला. तथापि, आजही अनेक भाजीपाला व फळे उत्पादक मालाच्या विक्रीसाठी बाजार समित्यांवरच अवलंबून असल्याचे दिसून येते. कायदा दुरुस्ती होऊनही त्याचा म्हणावा तसा फायदा उत्पादकांनी घेतला नाही. फळे, भाजीपाला उत्पादकांच्या संघांनी पुरवठा करणाऱ्या शाश्वत साखळ्या निर्माण करणे आवश्यक आहे.

येणाऱ्या काळात स्वस्त रेल्वे वाहतुकीला प्राधान्य देणे, परराज्यात शेतमालनिहाय ॲग्रीगेशन सेंटर्स उभारून त्याद्वारे शेतमालाचे वितरण शेजारील राज्यात करणे, इतर राज्यांत पीकनिहाय व्यापार प्रतिनिधी नेमणे या बाबींचा गांभीर्याने विचार करावा लागेल. त्या त्या शेतमालाच्या क्लस्टर्समध्ये संबंधित शेतमाल प्रक्रिया उद्योग निर्माण करणे गरजेचे आहे. बाजारभाव कमी असतात, त्या काळात शेतमाल साठवणुकीसाठी शासकीय यंत्रणांबरोबरच शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्यांनी पुढे येऊन शीतगृहे, गोडावून, प्राथमिक प्रक्रिया केंद्र उभारणी करण्याची गरज आहे.

अंतिमत: उत्पादक शेतकऱ्यांनी संघटित होणे, आपला माल प्रक्रिया करणे, साठवणूक करणे या मार्गाचा अवलंब करून पाहिजे तेव्हाच परवडेल, अशा किमतीस शेतमाल विक्रीची निर्णयक्षमता शेतकऱ्यात आणणे गरजेचे आहे.

# कृषी उत्पन्न बाजार समितीची काजूबी तारण योजना

लोकमत न्यूज नेटवर्क

**रत्नागिरी :** रत्नागिरी जिल्हा कृषी उत्पन्न बाजार समितीतर्फे काजूबी तारण योजना राबविण्यात येणार असून, त्यासाठी दोन कोटीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. कोरोनामुळे संपूर्ण देश लॉकडाऊन असल्याने यावर्षी काजूबी खरेदी पूर्णपणे थांबली असल्याने शेतकऱ्यांसाठी काजूबी तारण योजना फायदेशीर ठरणार आहे.

गतवर्षी कृषी उत्पन्न बाजार समितीकडे जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी १५ हजार किलो काजूबी तारण ठेवली होती. प्रतिकिलो शंभर रुपयेप्रमाणे शेतकऱ्यांना कर्ज वितरण करण्यात आले होते. जुलैमध्ये १३० ते १४० रुपये दराने काजूबी विकल्यानंतर शेतकऱ्यांना दिलेली तारण रक्कम वजा करून उर्वरित पैसे शेतकऱ्यांना देण्यात आले होते. यावर्षीदेखील शेतकऱ्यांना लॉकडाऊनच्या काळात काजूबी तारण योजना फायदेशीर ठरणार आहे. रत्नागिरी जिल्हा कृषी उत्पन्न बाजार समितीतर्फे काजूबी तारण योजना राबविण्याचे निश्चित केले असून, त्यासाठी दोन कोटीचे उद्दिष्ट ठेवले आहे.

> पीक तारण कर्ज योजनेत काजू व सुपारी पिकांचा समावेश आहे. यावेळी हंगामाच्या सुरुवातीलाच लॉकडाऊन घोषित करण्यात आल्याने खरेदी पूर्णत: थांबली आहे. शिवाय सुरुवातीला खरेदीसाठी असलेला भाव अत्यल्प होता. परिणामी शेतकऱ्यांनी काजूबी साठवून ठेवली आहे. सध्या आर्थिक विवंचनेत सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी काजूबी तारण योजना राबविण्यात येणार आहे.
>
> \- **संजय आयरे,** सभापती, रत्नागिरी जिल्हा कृषी उत्पन्न बाजार समिती.



शेतकऱ्यांना काजूबी मधून चांगला भाव मिळावा, यासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीतर्फे जिल्ह्यात तारण योजना राबविण्यात येते. गतवर्षी उत्पादन अल्प असतानाही ९० टन काजू तारण ठेवण्यात आला होता. काजूला भाव नसल्याने शेतमाल तारण योजनेला शेतकऱ्यांचा चांगला प्रतिसाद लाभला. पणन मंडळाच्या सहकार्याने राबविण्यात येत असलेल्या योजनेला शेतकऱ्यांकडून गेली दोन वर्षे चांगला प्रतिसाद लाभत आहे. गतवर्षी दरामुळे लिलाव प्रक्रिया संथगतीने झाली. यावर्षी देखील लॉकडाऊनमुळे खरेदी थांबली असून, दराचाही प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे बाजार समितीतर्फे शेतकऱ्यांसाठी शेतमाल तारण योजनेचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबत लवकरच शेतकऱ्यांना सूचना करण्यात येणार आहेत.

जिल्ह्यातील ९१ हजार ५३० हेक्टर क्षेत्रावर काजूची लागवड करण्यात आली असून, ८३ हजार २९२ हेक्टर क्षेत्र उत्पादनक्षम आहे. दरवर्षी सुमारे १ ते सव्वा लाख मेट्रिक टन काजू उत्पादन घेण्यात येते. हवामानातील बदलामुळे यावर्षी तीस ते चाळीस टक्के उत्पादनात घट झाली आहे. हंगामाच्या सुरुवातीलाच लॉकडाऊन घोषित करण्यात आले. त्यावेळी किरकोळ खरेदीचा दरही अल्प होता. त्यामुळे शेतकऱ्यांना सध्या काजूबी साठवून ठेवावी लागली आहे. विक्री व्यवस्था बंद असल्याने शेतकऱ्यांनी तारणपीक कर्ज योजनेचा लाभ घेण्याचे ठरविले आहे. बाजार समिती शेतकऱ्यांना या योजनेबाबत जागृत करत आहे.

# पणन मंडळाच्या पोर्टलद्वारे २५ हजार डझन हापूसची विक्री

पुणे, दि. १२ (प्रतिनिधी) – पणन मंडळामार्फत पोर्टलद्वारे सुरू असलेल्या ऑनलाईन आंबा विक्रीत आत्तापर्यंत २५ हजार डझन हापूस आंब्याची विक्री झाली आहे. ११२ खरेदीदारांनी हा आंबा खरेदी केला असून, यातून सुमारे ३ कोटी रुपयांची उलाढाल झाली आहे.

कोरोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर यंदा शेतकरी ते ग्राहक थेट विक्री आंबा महोत्सव आयोजन करणे शक्य नाही. त्यामुळे आंबा विक्रीसाठी कोकणातील आंबा उत्पादकांना शहरात यावे लागू नये, तसेच शहरातील ग्राहकांनाही घराबाहेर किंवा सोसायटीबाहेर पडावे लागू नये, यासाठी उत्पादक ते ग्राहक या दोघांनीही

## आत्तापर्यंत ३ कोटी रुपयांची उलाढाल

ऑनलाईन पोर्टलद्वारे आंबा खरेदी-विक्रीची माहिती उपलब्ध व्हावी, यासाठी पणन मंडळाच्या www.msamb.com या संकेतस्थळावरील Buyer Seller Information लिंकद्वारे अथवा bs. msamb. com या लिंकद्वारे खरेदीदारांना नोंदणीची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. संकेतस्थळांवर कोकणातील देवगड आणि रत्नागिरी हापूस आंबा उत्पादकांनी प्रतिसाद देत नोंदणी केली. आत्तापर्यंत कोकणातील ३२५ आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी आणि ११२ खरेदीदारांनी नोंदणी केली असून, त्याद्वारे २५ हजार डझन आंब्यांची विक्री झाली आहे, अशी माहिती मंडळाचे सहायक सरव्यवस्थापक मंगेश कदम यांनी दिली.

# ई-नाम कार्यप्रणालीनुसार बाजार समित्या सुरू ठेवा

## राज्य कृषी पणन मंडळाची भूमिका

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सध्याच्या कोरोनाच्या स्थितीत सोशल डिस्टन्सिंग पाळून ई-नाम कार्यप्रणालीनुसार कामकाज करणे शक्य आहे. त्यामुळे पुणे जिल्ह्यातील दौंड, शिरूर, जुन्नर, खेड, पुणे, बारामती व इंदापुर या बाजार समित्या ई-नामला जोडल्या आहेत. संकट काळात या समित्यांनी ई-नामचा वापर केल्यास शेतकरी व इतर संबंधित घटकांना त्याचा उपयोग होऊन जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा सुरळित सुरू होईल. त्यानुसार ईनामचे कामकाज सुरु ठेवण्याबाबत जिल्हाधिकारी स्तरावरून समित्यांना सूचना द्याव्यात अशी भूमिका राज्य कृषी पणन मंडळाने घेतली आहे.

मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांनी याबाबत पुणे जिल्हाधिकाऱ्यांना यापूर्वीच पत्र दिले असून, त्यामध्ये मंडळाची भूमिका स्पष्ट केली आहे. ई-नाम कार्यप्रणालीनुसार ई-नाम मोबाईल अॅपचा वापर करून ऑनलाइन बोली लावता येते. तसेच, खरेदीदारांमार्फत शेतकरी व इतर संबंधितांच्या खात्यात ऑनलाईन पद्धतीने थेट पैसे जमा करता येतात. त्यामुळे सध्याच्या कोरोनाच्या संकटसमयी ई-नाम व्यवस्था फायदेशीर ठरणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या शेतमालास रास्त भाव मिळवून देण्यासाठी देशपातळीवर एक बाजार या संकल्पनेवर आधारित ई-नाम योजना सुरू करण्यात आली. देशात ५८५ बाजार समित्या ई-नामला जोडल्या आहेत. नव्याने ४१५ बाजार समित्या जोडण्याबाबत केंद्राकडून कार्यवाही सुरू आहे. याप्रमाणे देशातील एक हजार बाजार समित्या ई-नामला जोडण्याचे उद्दिष्ट केंद्र सरकारने ठेवले आहे. महाराष्ट्रातील ६० बाजार समित्यांचा समावेश ई-नाममध्ये आहे. तर केंद्राने नव्याने निवडलेल्या ४१५ पैकी राज्यातील ५८ बाजार समित्या ई-नामशी जोडण्याचे काम सुरू असल्याचेही पवार यांनी नमूद केले आहे.

लोकमत

## पणन संचालक : बाजार समित्यांना लेखीपत्र

# बाजार समित्यांचे कामकाज सुरु ठेवण्याचे निर्देश

लोकमत न्यूज नेटवर्क

**अमरावती :** कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजना करुन कृषी उत्पन्न बाजार समित्याचे कामकाज सुरु ठेवावे, असे आदेश राज्याचे पणन संचालक सुनील पवार यांनी सर्व बाजार समित्यांना गुरुवार, १४ मे रोजी दिले आहे.

कोविड-१९ च्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर घ्यावयाच्या दक्षतेबाबत पणन संचालकांनी वेळावेळी सूचना दिल्यात. फिजिकल डिस्टन्सिंग व इतर उपाययोजना करुन अनेक बाजार समित्यांमध्ये कामकाज सुरु आहे. तथापी, काही बाजार समित्या सदर उपाययोजना न करता थेट बाजार आवार बंद ठेवत आहेत. समितीचे कार्यालय सुरु आहे मात्र, आवक नाही, अशा प्रकारचा अहवाल पणन विभागाकडे दिला जात आहे. कोरोनाच्या संकटकाळात पुरवठा साखळी



विस्कळीत झालेली असताना शेतकऱ्यांच्या मालविक्रीसाठी बाजार सुरु ठेवणे समित्यांची कायदेशीर आणि नैतिक जबाबदारी असताना काही ठिकाणी ठोस कारणांशिवाय कामकाज बंद करण्यात आले आहे. ही बाब अत्यंत गंभीर व कर्तव्यात कसूर दर्शविणारी आहे. याची जाणीव बाजार समितीचे सर्व घटकांनी घेणे गरजेचे आहे. कोरोनाचे संकटामुळे दीर्घकाळ बाजार बंद ठेवल्यास शेतकरी व ग्राहक अडचणीत येण्याची शक्यता आहे. शेतमालाचे व्यवहार व वाहतूक सुरु ठेवण्याबाबत केंद्र व राज्य शासनाने अत्यंत सूस्पष्ट निर्देश दिले आहेत. याबाबत बाजार समिती संचालक मंडळ व समितीवरील शासन प्रतिनिधी सहायक, उपनिबंधक यांनी स्थानिक प्रशासनाशी सातत्याने संपर्क ठेवण्याच्या सूचना पत्राव्दारे पणन संचालकांनी दिल्या आहेत. दीर्घकाळ बाजार बंद ठेवल्याने समित्यांच्या आर्थिक स्थितीबाबत विपरीत परिणाम होतो. बाजार समितीचे काही घटक बाजार सुरु करण्यास ठोस कारणांशिवाय असहकार्य करीत असल्यास तातडीने पर्यायी व्यवस्था करुन कामकाज सुरु करणे अपेक्षित आहे. जेथे आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत लेखी आदेश प्राप्त असतील तेथे जिल्हा उपनिबंधक व जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनात योग्य कार्यवाही करावी. येणारा पावसाळा व शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन शेतकऱ्यांचे प्रतिनिधीत्व करणारे बाजार समितीचे संचालक मंडळ व प्रशासक सर्व घटकासह कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजना करुन नियमित कामकाज सुरु ठेवावे, असे पणन संचालकांनी कळविले. अमरावती बाजार समितीमधील बंद पडलेली शेतमालाची खरेदी, विक्री दोन दिवसांपासून सुरळीत झाल्याची माहिती बाजार समितीचे उपसभापती नाना नागमोते यांनी दिली.

### कापूस खरेदीची गती वाढवा

कृषी उत्पन्न बाजार समिती दर्यापूर, अंजनगाव सुर्जी येथे मोठ्या प्रमाणावर कापूस विक्रीसाठी नोंदणी केलेली आहे. त्यामुळे बाजार समिती स्तरावर लवकर कापूस खरेदी करण्यासाठी दररोज ७० ते ८० कापसाची वाहने फिजिकल डिस्टन्सिग घेऊन कापसाचे मोजमाप करावे व कापूस खरेदीची गती वाढवावी, अशा सूचना कापूस पणन महासंघाने अमरावती, अचलपूर, अंजनगाव सुर्जी, दर्यापूर, आसेगाव, वरुड, नांदगाव खंडेश्वर येथे केंद्रप्रमुखांना १२ मे रोजी काढलेल्या आदेशाव्दारे दिल्या आहेत.

hindustantimes

# Export of agri commodities increases despite lockdown

Abhay Khairnar
abhay.khairnar@htlive.com

## EXPORTS FROM APRIL 1 TO MAY 19, ACCORDING TO MSAMB

- The MSAMB export data shows that from April 1 to May 19 this year, the total export of garlic stood at 1168 metric tonnes while it was 846 metric tonnes last year during the corresponding period.
- Lemons also reported a higher export with 653 metric tonnes compared to 283 metric tonnes last year while chillies stood at 1522 metric tonnes compared to 1409 metric tonnes last year and bananas at 33948 metric tonnes which was 23456 metric tonnes last year.
- Most of the export happened through the sea route and for countries in the Middle East, Sri Lanka, Bangladesh, and other neighbouring countries. Mangoes and grapes were the only fruit that went by air to Europe.

**PUNE:** India's export of agriculture based commodities such as garlic, lemons, chilies and bananas have been higher this year than previous years, despite the national lockdown.

According to an official from the Maharashtra state agricultural marketing board (MSAMB), India's export in April and May 2020 has been higher than May 2019.

The MSAMB export data shows that from April 1 to May 19 this year, the total export of garlic stood at 1168 metric tonnes while it was 846 metric tonnes last year during the corresponding period.

Lemons also reported a higher export with 653 metric tonnes compared to 283 metric tonnes last year while chillies stood at 1522 metric tonnes compared to 1409 metric tonnes last year and bananas at 33948 metric tonnes which was 23456 metric tonnes last year.

Most of the export happened through the sea route and for countries in the Middle East, Sri Lanka, Bangladesh, and other neighbouring countries. Mangoes and grapes were the only fruit that went by air to Europe.

MSAMB managing director Sunil Pawar said, "Despite other sectors affected badly due to Covid-19, we have been able to save the agriculture export."

According to Pawar, agriculture export mainly increased for bananas, lemons, chilies, and garlic.

"During the period from April 1 to May 19, total 17051 metric tonnes commodities were exported from JNPT and airways and almost 90 percentage of share is from Maharashtra. In the same period during 2019, a total 18389 metric tonnes commodities got exported which shows only 7 per cent less than previous year."

Pawar said the state government has created the central control room at Vashi in Mumbai which has helped to give single window licences for everything.

# लॉकडाउनमध्येही शेतकऱ्यांकडून शेतीमालाची यशस्वी निर्यात

## गेल्या वर्षीच्या तुलनेत निर्यातीत केवळ ७ टक्के घट



**पुणे (प्रतिनिधी): कोरोना टाळेबंदी मध्ये शेतमालाची पुरवठा साखळी विस्कळीत झाल्यानंतरही निर्यात मात्र सुरळीत ठेवण्यात पणन मंडळाला यश आले आहे. गेल्या वर्षीच्या १ एप्रिल ते १९ मे दरम्यान झालेली निर्यात आणि यंदाच्या वर्षी याच काळात झालेल्या निर्यातीची तुलना केली तर गेल्या वर्षीच्या तुलनेत केवळ ७ टक्क्यांची घट झाली आहे. कोरोनाच्या संकटात देखील शेतकऱ्यांनी निर्यात केल्याने शेतमालाचे निर्याती अभावी होणारे नुकसान कमी करण्यात शेतकरी यशस्वी झाले आहेत. तर गेल्या वर्षाच्या तुलनेत यावर्षी केळी, लिंबु, मिरची, आणि आल्याच्या निर्यातीत वाढ झाली आहे.**

कोरोना टाळेबंदीमध्ये बाजार समित्या बंद, देशांतर्गत वाहतुक बंदी या कारणांनी पुरवठा साखळी काही प्रमाणात खंडीत आणि विस्कळीत झाली होती. यामध्ये शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. मात्र राज्य कृषी पणन मंडळाने निर्यातीला अडचणी येऊ नयेत म्हणुन शेतमाल निर्यात नियंत्रण कक्षाची स्थापना केली होती. या केंद्राद्वारे विविध प्रमाणपत्रे तातडीने देण्याच्या व्यवस्थे बरोबरच शेतकरी आणि निर्यातदारांचा समन्वय साधत निर्यात सुरळीत ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. पान ४ वर

**शेतीमाल निर्यातीची तुलनात्मक स्थिती (टनांत)**

| शेतीमाल | २०१९ | २०२० |
|---|---|---|
| केळी | २३,४५६ | ३३९४८ |
| कांदा | २६३९८९ | २२५६८६ |
| द्राक्षे | १२१३७ | ९५०९ |
| आंबा | १६७४६ | ८६४० |
| डाळिंब | ३२७१ | १७७३ |
| लिंबु | २८३ | ६५३ |
| मिरची | १४०९ | १५२२ |
| आले | ८४६ | ११६८ |
| इतर | १८३८९ | १७०५११ |

# लॉकडाउनमध्येही शेतकऱ्यांकडून शेतीमालाची यशस्वी निर्यात

➔ पान १ वरून

सध्या जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट आणि मुंबईचे विमानतळ मार्गे समुद्र आणि हवाईमार्गे मालवाहु विमानांव्दारे निर्यात सुरु आहे. यामध्ये कंटेनर आणि ट्रेलरसाठी वाहनचालकांची कमतरता असतानाही तसेच वाहतुकीच्या वेळी रस्त्यांवर कोणत्याही जेवणाच्या तसेच वाहन दुरुस्तीच्या सुविधा नसतांनाही समुद्रमार्गे निर्यात सुरु आहे.

**आंबा निर्यातीत हापूसचा वाटा मोठा**

गेल्या वर्षी १ एप्रिल ते १९ मे २०१९ मध्ये १६ हजार ७४६ टन निर्यात झाली होती. यामध्ये हापूससह विविध जातींचा समावेश होता. इतर जातींचा आंबा परराज्यांमधुन पोर्ट ट्रस्ट आणि मुंबई विमानतळावरुन निर्यात होतो. मात्र यंदा वाहतुक ठप्प झाल्याने इतर वाणांच्या आंब्याची तुलनेने कमी वाहतुक आणि निर्यात झाली. यामुळे कोकणातुन तुलनेने हापूसला जास्त प्रमाणात उपलब्ध झाल्याने हापूसची निर्यात जास्त झाली. एकुण झालेल्या ८ हजार ६४० टन निर्यातीमध्ये ५२% टक्के हापूसचा वाटा होता.

**केळीच्या निर्यातीत दिडपटीने वाढ**

गेल्यावर्षी १ एप्रिल ते १९ मे दरम्यान २३ हजार ४५६ टन निर्यात झाली होती. हिच निर्यात यावर्षी ३३ हजार ९४८ टन झाली आहे. म्हणजेच कोरोना टाळेबंदीतही केळीची निर्यात सुमारे दिडपट झाली आहे.

**लिंबाच्या निर्यातीत वाढ**

गेल्या वर्षी लिंबाची निर्यात २८३ टन होती ती ६५३ टन झाली आहे.

**इतर भाजीपाल्यांमध्ये ७ टक्के घट**

इतर फळे व भाजीपाल्याच्या निर्यातीत फारसा फरक दिसत नसून गेल्यावर्षी इतर फळे व भाजीपाल्याची निर्यात १८ हजार ३८९ टन होती. यावर्षी १७ हजार ५१ टन झाली आहे. म्हणजेच गेल्या वर्षीच्या तुलनेत फक्त ७ टक्के घट आहे.

> *कोरोना टाळेबंदीमध्ये देशांतर्गत शेतमाल साखळी विस्कळीत झाल्यानंतर निर्यातीला देखील अडचणी येतील अशी परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र पणन सचिव अनुपकुमार, राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांच्या संकल्पनेनतून राज्य शेतमाल निर्यात सनियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला. या कक्षाद्वारे शेतकरी आणि निर्यातदारांचा समन्वय साधत, त्यांच्या अडचणी सोडवत कोरोना टाळेबंदीतही शेतमालाची निर्यात सुरळीत ठेवण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नांमुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा काही भाजीपाल्यांची निर्यात वाढ करणे शक्य झाले. तर केवळ ७ टक्के घट जरी दिसत असली तरी. शेतकऱ्यांचे निर्याती अभावी होणारे नुकसान मोठ्याप्रमाणावर कमी करण्यात यश आले आहे.*
>
> *– **डॉ. भास्कर पाटील**, प्रमुख, शेतमाल निर्यात सनियंत्रण कक्ष*

# उत्पादक– ग्राहक पुरवठा साखळीमध्ये वाढत्या संधी

● सुनिल पवार,
(व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ)

**शेतकरी आणि शेती व्यावसायिकांनी काळाची पावले ओळखून बदलत्या बाजारपेठेतील संधींचा लाभ घेतला पाहिजे. उत्पादक ते ग्राहक पुरवठा साखळी निर्माण करण्याची ही मोठी संधी आहे. काळाची गरज ओळखून केंद्र सरकार मार्केट इंटलिजन्सबाबत स्वतंत्र यंत्रणा तयार करत आहे.**



कोरोना आपत्तीच्या काळातही भविष्यातील प्रगतीच्या संधी दडल्या आहेत. मॉस्लो या जगविख्यात मानसशास्त्रज्ञाचा मानवी गरजांचा पिरॅमिड प्रसिद्ध आहे. यामध्ये सर्वोच्च टोकाचे प्राधान्य आत्मसन्मानाला आहे. त्यानंतर आदर, सामाजिक बाबी, सुरक्षा आणि सर्वात शेवटी अन्न, वस्त्र, निवारा आदी मूलभूत शारीरिक गरजांचा क्रम आहे. सध्याच्या कोरोनाच्या काळात मॉस्लोचा पिरॅमिड उलटा झाला. आत्मसन्मान तळाला गेला आणि अन्नाची गरज सर्वोच्च स्थानी आली. शेती आणि शेती संबंधित व्यवसायांच्या भविष्याच्या अनुषंगाने ही फार महत्त्वाची बाब आहे. कोरोनाने आपल्याला अनेक धडे दिले. आपत्तीत तग धरुन भविष्यात प्रगती करायची असेल तर स्वतःमध्ये बदल करावा लागेल, हे सर्व पातळ्यांवर स्वीकारले जात आहे. काळानुसार बदल न केल्याने अनेक बड्या कंपन्या कालबाह्य झाल्या. शेती व संलग्न व्यावसायिकांनाही काळाची पावले ओळखून बदल करावे लागतील. नवीन बदल स्वीकारताना, व्यवसाय सुरु करताना, भांडवल नाही, बँका कर्ज देत नाही अशी कारणे सांगितली जातात. कल्पकता असेल तर भांडवलाशिवाय व्यवसाय उभारता आणि यशस्वी करता येतो. हे ओला,अमेझॉन, ओयो, वॉट्सअपसारख्या उद्योगांनी दाखवून दिले आहे. कोरोनाने अनेक क्षेत्रातील त्रृटी, बलस्थाने स्पष्ट केली आहेत. त्या आधारे बदल करत, स्वीकारत पुढे जायला हवे. कोरोनामुळे झालेल्या लॉकडाऊनमुळे शेतमालाची पुरवठा साखळी पूर्णतः विस्कळित झाली. जीवनावश्यक गोष्टींच्या पुरवठ्याचे आव्हान निर्माण झाले. अन्न पुरवठा ही प्रमुख बाब बनली. कोरोनाने शिकवलं की, तुमच्याकडे वाहन, टीव्ही, फ्रिज नसेल तरी चालेल, पण खायला अन्न पाहिजे. अन्न पुरवठा ही शाश्वत संधी असल्याचे स्पष्ट झाले.

## ग्राहकांच्या मानसिकतेत बदल

कोरोना कालावधीत ग्राहकांमध्ये शेतमालाच्या गुणवत्तेबाबत जागरूकता निर्माण झाली. हॉटेलचे खाद्यपदार्थ नाकारून निरोगी, स्वच्छ, प्रतिकार क्षमता वाढवणारे घरगुती साधे अन्न, परंपरागत खाद्यान्न, आयुर्वेदिक व वनौषधी उत्पादने, सेंद्रिय, रसायन अवशेषमुक्त शेतमालाची मागणी वाढली. संत्रा उत्पादकांना दुप्पट दर मिळाला. परदेशातही मसाल्यांच्या पदार्थांची मागणी वाढली, निर्यातीस संधी निर्माण झाल्या. गर्दीत जायची भीती वाटत असल्याने ग्राहकांना आता घरपोच शेतमाल मिळण्याची सवय लागणार आहे.

## नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार

एरवी नवीन तंत्रज्ञानाला फारसा प्रतिसाद मिळत नसताना कोरोनामुळे निर्माण झालेल्या स्थितीत शेतकऱ्यांनी स्वतःहून शेतमालाची प्रतवारी, पॅकिंग, ब्रॅन्डींग केले. क्रेट, बॉक्सचा वापर मोठ्या प्रमाणात सुरु झाला. वॉट्सअपवर शेतमालाच्या जाहिराती करत ब्रॅन्डिंगवर जोर देण्यात आला. या काळात मार्केट इंटेलिजन्सचा चांगला वापर झाला. परराज्यातील बाजारपेठांची माहिती घेऊन शेतकऱ्यांनी इतर राज्यात शेतमाल पाठवला. बांगलादेशात संत्रा निर्यात झाली. कृषी पणन मंडळामार्फत सर्व विभागांच्या समन्वयाने आंतरराज्य शेतमाल वाहतूक नियंत्रण कक्ष २४ तास सुरु ठेवण्यात आला. केंद्र सरकार मार्केट इंटलिजन्सबाबत वेगळी यंत्रणा तयार करत आहे.

## शेतकरी गटांना मिळाली संधी

शेतकरी, शेतकरी गट, उत्पादक कंपन्या, सहकारी संस्थांनी मुंबई, पुणे, नाशिक येथे शेकडो टन शेतमाल थेट घरपोच केला. दलाल कमी व्हावेत, थेट शेतमाल विक्री व्हावी असे नेहमी म्हटले जायचे. कोरोनाच्या काळात हे प्रत्यक्षात आले. मराठवाडा, विदर्भातील उत्पादक कंपन्याही मोठ्या प्रमाणात पुढे आल्या. विना मध्यस्थ पुरवठा झाल्याने शेतकऱ्यांना चांगला मोबदला मिळाला. यातून राज्यभर अनेक यशोगाथा तयार झाल्या आहेत.

## निर्यात, मूल्यवर्धनाला गती

निर्यातीच्या आघाडीवरही अनेक बदल झाले. अनेक उत्पादनांची निर्यात नेहमीपेक्षा जास्त झाली. निर्यातदारांनी थेट शेतकरी, उत्पादक कंपन्यांशी संपर्क साधून शेतमाल खरेदी केला. शेतकरी व निर्यातदारांची थेट सांगड घातली गेली. ट्रेसिबिलीटी पद्धत सोपी होऊन चालना मिळाली. शेतकऱ्यांना प्रक्रियेचे महत्त्व कळले. शिल्लक राहिलेल्या शेतमालाचे मूल्यवर्धन सुरु झाले. सांगलीतील शेतकऱ्यांनी बेदाणा, कोकणातील शेतकऱ्यांनी हापूस आंबा पल्प करून ठेवला. अनेक शेतकरी, गट, कंपन्यांनी कोरोनाच्या काळात अतिशय उत्कृष्ट काम करून दाखवले आहे.

### राज्यातील कृषी पणन व्यवस्था

- **राज्यातील ३०६ मुख्य आणि ५९६ उपबाजारांमध्ये फळे, भाजीपाला, अन्नधान्याची २,०४७ लाख क्विंटल आवक तर पन्नास हजार कोटींची उलाढाल. राज्यात ६३ खासगी बाजार. ११०० थेट पणन परवान्यांच्या माध्यमातून १५ हजार कोटींची उलाढाल.**
- **सुमारे ६५ हजार कोटी रुपयांची कृषी पणन उलाढाल.**
- **२०१६-१७ पासून ई नाम खरेदी विक्री व्यवस्था. त्यात सुमारे १२ लाख शेतकरी आणि १७ हजार खरेदीदारांची नोंदणी. अद्याप ही योजना बाजार समित्यांमध्ये आहे. यापुढे ऑनलाइन ट्रेडिंग वाढत जाईल.**

### शाश्वत बाजारपेठेची उपलब्धता

- **भारताची १३० कोटी लोकसंख्या म्हणजे ४० कोटी कुटुंबे गृहीत धरली आणि प्रत्येक कुटुंबाचा अन्नावरील मासिक खर्च ३००० रुपये धरला तरी महिन्याला एक लाख २० हजार कोटी रुपयांची शाश्वत बाजारपेठ उपलब्ध.**
- **द्राक्ष, डाळिंब, कांदा उत्पादनात आपण पहिल्या क्रमांकावर. केळी, संत्रा व एकूण फळ उत्पादनात देशात दुसऱ्या क्रमांकावर.**
- **ज्वारी उत्पादनात पहिल्या तर सोयाबीन, तूर उत्पादनात दुसऱ्या क्रमांकावर.**
- **फळे,भाजीपाला, अन्नधान्यासह सर्वच कृषी उत्पादनांमध्ये मोठा वाव.**

## केंद्राचे अध्यादेश आणि बदलती बाजार व्यवस्था

कृषी आणि पणन सुधारणांद्वारे शेतकऱ्यांना बाजार व्यवस्थेचे सर्व पर्याय खुले होणार असल्याने देशातील कृषी पणन व्यवस्था मोठ्या बदलांना सामोरी जाणार आहे. बाजार समितीच्या आवारात खरेदी विक्री तसेच त्याबाहेरील खरेदी विक्रीसाठी परवान्यांचे बंधन काढून टाकण्यात आले आहे. शेतमाल साठा मर्यादा उठवली आहे. शेती करारांमध्ये पशुधन आणि शेतीसलग्न सेवांचा समावेश झाला आहे. केंद्राचे अध्यादेश लागू होताना राज्याचेही कृषी पणन कायदे अस्तित्वात राहणार आहेत. आता विविध कायद्यातून मुक्त केल्याने शेतकऱ्यांनी विविध पर्यायांचा खुबीने वापर करत, स्वतःला आत्मनिर्भर करण्याची गरज आहे.

## ऑनलाइन शेतमाल व्यापारात वाढ

लॉकडाऊन सुरु झाल्यापासून शेतमालाचे ऑनलाइन ट्रेडिंग मोठ्या प्रमाणात सुरु झाले. मोबाईल संदेश, वॉट्सअप, वेगवेगळ्या अॅपचा वापर करून ग्राहकांकडून चांगली मागणी नोंदवण्यात आली. त्यानुसार थेट ग्राहकांना शेतमाल पुरवठा झाला. ई पेमेंट व्यवस्था शेतकऱ्यांनी आपलीशी केली. आंब्याची खरेदी-विक्री ऑनलाइन झाली. गेल्या शंभर वर्षात पहिल्यांदा आंबा अडत्याविना थेट विकला गेला आणि शेतकऱ्यांना दुप्पट पैसा मिळाला. याशिवाय अनेक शेतकऱ्यांनी स्विगी, झोमॅटो अशा थेट सेवा पुरवठादार कंपन्यांसोबत भागीदारी केली. त्यामार्फत १० ते २० लाख ग्राहकांना थेट शेतमाल पुरवठा करण्यात आला.




निवासी सोसायटीमध्ये ग्राहकांना शेतकरी गटातर्फे भाजीपाला विक्री.

### व्यावसायिक संधी

**कोरोना कालावधीत स्पष्ट झालेल्या बाबी, घडत असलेले बदल व बाजार व्यवस्थेत होत असलेल्या सुधारणांच्या पार्श्वभूमीवर शेतकरी व व्यावसायिकांना अनेक संधी आहेत. उत्पादक ते ग्राहक पुरवठा साखळी निर्माण करणे ही मोठी संधी आहे. अमेझॉन सारख्या अनेक मोठ्या कंपन्या त्यात उतरत आहेत. पायाभूत सुविधा, वाहतूक, शीतगृहे, पॅकहाऊस, प्रयोगशाळा उभारणी, सेंद्रिय, पारंपरिक व रोगप्रतिकारक शक्ती वाढविणारे खाद्यान्न, रेडी टू इट किंवा रेडी टू कुक प्रकारचे अन्न, हुरड्यासारखे घरगुती खाद्यपदार्थ निर्मिती आणि पुरवठा यात नव्या संधी खुल्या होत आहेत. बाजाराच्या मागणीनुसार सातत्याने शेतमाल पुरवठा होण्यासाठी अॅग्रीगेटर म्हणून काम करण्यास मोठा वाव आहे. ई प्लॅटफॉर्म आणि इ पेमेंटचा वापर मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. राज्यात दोन लाख सहकारी संस्था आहे. त्यापैकी एक लाख हाउसिंग सोसायट्यांची सविस्तर माहिती उत्पादकांसाठी उपलब्ध आहे. उत्पादक कंपन्यांमार्फत त्यांना शेतमाल पुरवठा सुरु झाला आहे. याशिवाय मूल्यवर्धन व पुरवठा साखळीत अनेक टप्पे असतात. त्यातही नवनवीन व्यवसाय सुरु होऊ शकतात.**

अॅग्रोवन

# शेतमालाचे ऑनलाइन तारण कर्ज होणार उपलब्ध

## सहकार मंत्री बाळासाहेब पाटील : तीन महिन्यांसाठी 'वखार'ची प्रायोगिक योजना

**मुंबई (प्रतिनिधी) :** टाळेबंदी कालावधीत शेतकऱ्यांना राज्य वखार महामंडळाच्या गोदामांमध्ये मालाची साठवणूक करता यावी आणि प्राप्त गोदाम पावतीवर ऑनलाइन पद्धतीने तारण कर्ज उपलब्ध व्हावे, यासाठी महामंडळ आणि राज्य सहकारी बँक यांच्या संयुक्त विद्यमाने प्रायोगिक तत्त्वावर ऑनलाइन तारण कर्ज योजना सुरू करण्यात आली आहे, अशी माहिती सहकार मंत्री बाळासाहेब पाटील यांनी दिली.

श्री. पाटील म्हणाले, ही नावीन्यपूर्ण योजना प्रायोगिक तत्त्वावर तीन महिन्यांसाठी प्रथमतः राबविण्यात येत आहे. यासाठी मिळणारा प्रतिसाद पाहून इतर बँकांच्या माध्यमातूनही सुरू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. राज्य वखार महामंडळाची राज्यात विविध ठिकाणी गोदामे असून सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अन्नधान्य तसेच शेतमाल, औद्योगिक मालाची मोठ्या प्रमाणात साठवणूक करण्यात येते. गोदामातील साठवणुकीवर वखार पावती देण्यात येते, ही वखार पावती वखार अधिनियम, १९६० नुसार पराक्रम्य (Negotiable) असून त्यावर बँकेमार्फत तारण कर्ज उपलब्ध होते. वखार पावतीवर शेतकऱ्यांना प्रत्यक्ष बँकेमध्ये जाऊन विविध कागदपत्रांची पूर्तता करावी लागते. परंतु या नावीन्यपूर्ण योजनेंतर्गत शेतकरी वखार महामंडळाच्या संगणकीय प्रणाली आधारे ऑनलाइन पद्धतीने बँकेस तारण कर्जासाठी आवश्यक ती कागदपत्रे सादर करून कर्ज प्राप्त करू शकतात. त्यामुळे शेतकऱ्यांचा बँकेत जाण्याचा वेळ व पैसा वाचेल.

यामध्ये ब्लॉक तंत्रज्ञानाचा वापर केला असल्याने तारण कर्ज देणे, त्याची परतफेड, सध्याचे बाजार भाव, उपलब्ध अन्न धान्य साठा या सर्व गोष्टी ब्लॉकचेन तंत्रज्ञानाद्वारे ऑनलाइन होणार असल्याने शेतकऱ्याचा मोठा फायदा होणार आहे. आणि ऑनलाइन तात्काळ कर्ज उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांच्या वेळेची बचत तसेच कागदपत्रांसाठीच्या प्रवास खर्चात बचत होण्यास मदत होणार आहे, असेही मंत्री श्री. पाटील यांनी सांगितले.

### अशी असेल कर्ज प्रक्रिया..

- शेतकऱ्यांना यासंबंधीचे मोबाईल अॅप्लीकेशन डाऊनलोड करावे लागेल
- स्मार्टफोनच्या आधारे मराठीमध्ये अर्ज करता येईल
- मोबाईलवरच आवश्यक कागदपत्रे स्कॅन करून पाठविता येतील
- अर्ज केल्यानंतर बँकेकडून छाननी केली जाईल
- वखार पावतीवरील शेतमालाच्या किमतीच्या ७० टक्के कर्ज बँक शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करेल
- कर्ज सुविधा एक ते दोन दिवसात उपलब्ध करून दिली जाईल
- तारण कर्जाचे व्याजदर ९ टक्के असून इतर बँकेच्या तुलनेत कमी आहे
- तारण कर्जाची कमाल मर्यादा ५ लाख प्रति शेतकरी एवढी असेल
- वखार महामंडळाकडून शेतकऱ्यांना साठवणूक भाड्यात ५० टक्के सवलत
- वेळोवेळी कर्जाची रक्कम व व्याजाची माहिती शेतकऱ्यांस मोबाईलवर मिळेल
- शेतमाल विक्री वेळेस बँकेचे मुद्दल व व्याज ऑनलाइन भरणा केल्यावर शेतकऱ्याच्या वखार पावतीवरील बोजा कमी करण्यात येईल

Pune, Main
29/05/2020 Page No. 3

# विभागीय सहनिबंधक राहणार बाजार समित्यांचे समन्वय अधिकारी

## सर्व सूचनांची अंमलबजावणी गांभीर्याने करा : पणन संचालक सुनील पवार यांचे पत्र

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमधील सर्व कामकाजामध्ये समन्वय ठेवून कामकाज होण्यासाठी संबंधित विभागाचे विभागीय सहनिबंधक यांची समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी त्यांच्या विभागातील बाजार समित्यांसंदर्भात दिलेल्या सर्व सूचनांची अंमलबजावणी गांभीर्याने होईल, याची दक्षता घेऊन कामकाज करावयाचे आहे. तशा परिपत्रकीय सूचना पणन संचालक सुनील पवार यांनी सोमवारी (दि.३०) दिल्या आहेत.

१४ एप्रिलपर्यंत लॉकडाऊन काळात नागरिकांसाठीच्या अत्यावश्यक सेवांमध्ये प्रामुख्याने बँक सेवा, औषधे, भाजीपाला, किराणा, दूध इत्यादी आवश्यक बाबींची दुकाने चालू ठेवण्यात येत आहेत.

त्या पार्श्वभूमीवर पवार यांनी राज्यातील सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे सभापती व सचिवांना पत्र पाठवून सूचना दिलेल्या आहेत.

पणन संचालकांनी म्हटले आहे की, बाजार समितीमध्ये येणा-या व्यक्ती व बाजार घटकांचा प्रवेश नियंत्रित करण्यासाठी ठराविक प्रवेश गेट निश्चित करण्यात यावेत व तेथूनच त्यांना प्रवेश देण्यात यावा. बाजार समितीमध्ये येणाऱ्या व्यक्ती तसेच बाजार घटकांचे थर्मल टेंपरेचर स्कॅनरद्वारे स्क्रिनिंग करण्यात यावे. बाजार आवारात येणा-या व्यक्तींसाठी प्रवेशद्वाराजवळच सॅनिटायझर्सची व्यवस्था करण्यात यावी. बाजार समितीमध्ये येणाऱ्या व्यक्ती व बाजार घटकांच्या चेहऱ्यावर मास्क लावतील, याकडे बाजार समितीने लक्ष द्यावे. बाजार आवारात वावरणाऱ्या व्यक्ति किमान तीन फुट अंतरावर राहतील, याची दक्षता घ्यावी. बाजार आवारात असणाऱ्या स्वच्छतागृहांची स्वच्छता वारंवार करण्यात येऊन ते जास्तीत जास्त निर्जंतुक राहील, याची दक्षता घेण्यात यावी.

बाजार आवारामध्ये पुरेशा प्रमाणामध्ये हात स्वच्छ धुण्यासाठी साबण व पाण्याची व्यवस्था करावी. बाजार आवारात असणाऱ्या कॅन्टीनची व त्यामध्ये असणाऱ्या स्वयंपाकगृहाची वारंवार स्वच्छता करण्यात यावी. बाजार आवारात उपस्थित असणाऱ्या व्यक्तींनी खाद्यपदार्थ खाण्यापूर्वी हात स्वच्छ धुवावेत, यासाठी त्यांना प्रवृत्त करावे. बाजार आवारात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट तत्काळ लावण्यात यावी. बाजार आवारात सार्वजनिक स्वच्छता राहील, यासाठी दररोज बाजार संपल्यानंतर सोयीची वेळ निश्चित करून बाजार आवारात सोडियम हायपोक्लोराईड किंवा अन्य रसायनांचा वापर करावा. याबाबतच्या अधिक माहितीकरिता स्थानिक महानगरपालिका/नगरपालिकेच्या आरोग्य विभागाशी संपर्क साधावा. कोरोना विषाणूसंबंधी जनजागृती होण्यासाठी बाजार क्षेत्रात लोकांना कोरोना विषाणूपासून काळजी घेणेबाबत फलक/उद्घोषणा याद्वारे आवाहन करावे व आवश्यक ती माहिती द्यावी.

वरील सुचनांनुसार जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमार्फत अंमलबजावणी करून बाजार समित्यांचे कामकाज सुरळीतपणे चालू राहील, हे पाहण्याची जबाबदारी संबंधित जिल्हा उपनिबंधक यांचेवर राहील. तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या बाजार समित्यांबाबतीत ही जबाबदारी तालुका उपनिबंधक/सहाय्यक निबंधक यांचेकडे आहे. तथापि, जिल्ह्याच्या ठिकाणी किंवा मुंबईसारख्या मोठ्या कृषी उत्पन्न बाजार समितीची जबाबदारी संबंधित जिल्हा उपनिबंधकांची राहील, असेही त्यामध्ये म्हटले आहे.


### जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा सुरळीत चालू ठेवा

भाजीपाला, फळे, अन्नधान्य इत्यादी जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा नियमित होणे अत्यंत आवश्यक आहे. थेट परवानाधारक भाजीपाला, फळे व अन्य जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करीत आहेत. त्यासाठी शासनाकडून थेट परवाना घेतलेला आहे. राष्ट्रीय कर्तव्य पार पाडण्याच्या दृष्टीने याकामी आपली भूमिका महत्त्वाची असल्याने या जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा आपण सुरळीत चालू ठेवावा, असेही आवाहन पवार यांनी थेट परवानाधारकांना केले आहे.



नवी मुंबई: येथील बाजार समितीत सोमवारी (ता. ३१) खरेदीदारांच्या गर्दीवर पोलिसांच्या मदतीने 'सोशल डिटन्सींग'चा प्रयोग राबविला गेला. यासाठी लाकडी अडथळे लावण्यात आले होते. यामध्ये विशिष्ट अंतरावर एका रांगेत खरेदीदारांना सोडले जात होते. यावेळी प्रशासनाने परवानगी दिलेल्या ६० वाहनांनाच आवारात प्रवेश दिला गेला. प्रत्येक वाहनांवर जंतुनाशक फवारणी करण्यात येत होती. खरेदीदाराला हात स्वच्छ धुण्यास सांगितले जात होते. (वृत्त पान ४)

पुढारी



# १ हजार ३७ टन आंबा निर्यात

## पणन मंडळाच्या सुविधा केंद्रांतून उद्दीष्ट पूर्ण

- समुद्रामार्गे आंबा निर्यातीवर लक्ष केंद्रित करण्याचे नियोजन
- मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांची माहिती

**पुणे : प्रतिनिधी**

राज्य कृषी पणन मंडळाच्या निर्यात सुविधा केंद्राचा उपयोग करून संपलेल्या हंगामात आंब्यांची १ हजार ३७ मे. टन निर्यात पूर्ण झालेली आहे. पणन मंडळ, कृषी विभाग, अपेडा यांच्या संयुक्त प्रयत्नांना यश आले असून निर्यातीचे उद्दिष्ट पूर्ण झालेले आहे. पुढील वर्षीच्या आंबा हंगामात समुद्रामार्गे युरोपियन देशांत आंबा निर्यातीवर लक्ष केंद्रित करण्यात येणार असून आतापासूनच त्याचे नियोजन सुरू करण्यात आल्याची माहिती मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांनी दिली.

हापूस, केशर, बैगनपल्ली, लंगडा, चौसा आदी आंब्यांची निर्यात देशातून झालेली आहे. त्यामध्ये पणन मंडळाच्या सुविधांचा वापर करून युरोपियन युनियन, रशिया, न्यूझीलंड, जपान, मॉरिशियस या पाच देशांना सर्वाधिक आंबा निर्यात प्रथमच झालेली आहे. व्हेपर हिट ट्रीटमेंट करून हा आंबा या देशांना निर्यात केला जातो. निर्यातीमध्ये राज्य कृषी पणन मंडळाच्या निर्यात सुविधा केंद्राचा मोठा वाटा आहे. आंबा निर्यात करताना तेथील देशांना आवश्यक असलेली प्रक्रिया आंबा निर्यातीपूर्वी केली जाते. त्यामुळे निर्यातीमधील अडचणी दूर होत आहे. हॉट वॉटर ट्रीटमेंट व व्हेपर हिट ट्रीटमेंट या प्रक्रियांमुळे आंब्यांमधील फळमाशीची अंडी, अळी नष्ट होतात. तर कोयकिडा मरतो. त्यामुळे आंबा निर्यात कीडरोगमुक्त होण्यास मदत होते.

पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक डॉ. भास्कर पाटील म्हणाले की, मंडळाच्या तांत्रिक मदतीने चालूवर्षी एका खासगी निर्यातदाराने समुद्रामार्गे आंब्यांची निर्यात इंग्लंडला प्रथमच केली. ती यशस्वी झालेली असून पुढील हंगामात युरोपात समुद्रामार्गे आंबा निर्यात मोठ्या प्रमाणात करण्याची संधी आहे. त्यामुळे भारतीय आंबा बाजारात स्पर्धात्मकरीत्या उतरू शकेल.

| देश | निर्यात (टन) |
|---|---|
| अमेरिका | ५६८.५८ |
| ऑस्ट्रेलिया | २८.६७ |
| जपान | ४३.५८ |
| न्यूझीलंड | ७१.४२ |
| रशिया | २४.८३ |
| युरोपियन युनियन | २७३.७१ |
| मॉरिशियस | ३.३१८ |
| कॅनडा | ८.०० |
| दुबई | १५.०० |
| **एकूण** | **१०३७.१०८** |

# भाजीपाला-किराणा वाहतुकीसाठी पोलिसांनी सहकार्य करावे

## डॉ. दीपक म्हैसेकर : हमाल, बाजार समिती घटकांशी पोलिसांसमवेत समन्वय बैठक

**पुणे (प्रतिनिधी) :** कोरोना लॉकडाऊन मध्ये बाजार समितीमधील फळे भाजीपाला आणि किराणा भुसार विभागातील सेवा सुरळीत राहण्याबरोबर शहरातील या वस्तूंच्या वाहतुकीसाठी पोलीस प्रशासनाने विना अडथळा सहकार्य करावे, असे आवाहन विभागीय आयुक्त डॉ. दीपक म्हैसेकर यांनी केले आहे.



पोलिसांच्या अडवणुकीमुळे भुसार विभाग बंद करण्याची भूमिका पूना मर्चंट चेंबर आणि हमाल पंचायतीने ने घेतल्यानंतर बाजार समिती, पूना मर्चंट चेंबर, अडते, हमाल, तोलणार संघटनांच्या पदाधिकाऱ्यांसह पोलीस प्रशासनासोबत विभागीय आयुक्त कार्यालयात डॉ. म्हैसेकर यांनी चर्चा केली. यावेळी जिल्हाधिकारी नवल किशोर राम, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आयुष प्रसाद, अतिरिक्त पोलीस आयुक्त डॉ. संजय शिंदे, पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप पाटील, पणन संचालक सुनील पवार, पुरवठा विभागाचे उपायुक्त जयंत पिंपळगांवकर, जिल्हा पुरवठा अधिकारी भानुदास गायकवाड, अन्नधान्य वितरण अधिकारी अस्मिता मोरे, बाजार समिती प्रशासक बी. जे. देशमुख, चेंबरचे अध्यक्ष पोपटलाल ओस्तवाल, सचिव विजय मुथा, तोलणार संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र चोरघे, कामगार संघटनेचे अध्यक्ष संतोष नांगरे तसेच हमाल संघटना आदी उपस्थित होते.

डॉ. म्हैसेकर म्हणाले, "अन्नधान्य, भाजीपाला, किराणामाल याबरोबरच इतरही जीवनावश्यक वस्तू सुरळीत सुरू राहण्यासाठी प्रशासन सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. या वस्तूंची वाहतूक रस्त्यात पोलिसांनी अडवू नये, यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पासेस देण्यात येतील. तसेच आत्तापर्यंत पोलीस प्रशासनमार्फतही अत्यावश्यक सेवेतील काही ट्रक, टेम्पोचालक यांना पासेस वितरण करण्यात आले आहेत. त्यांना मालवाहतुकीस ये-जा करण्यास कुठल्याही प्रकारची अडचण भासणार नाही, याची जिल्हा प्रशासन पुरेपूर खबरदारी घेईल. बाजार समिती कामगारांनाही पास देण्यात येतील. परंतु त्या पासचा कुठल्याही प्रकारे गैरवापर होणार नाही, याची संबंधितांनी दक्षता घेणे आवश्यक आहे." कामगारांचा विमा उतरवण्यासाठी प्रशासनाच्या वतीने प्रयत्न केले जातील. दररोज ग्रामीण भागातून ये-जा करणाऱ्या कामगारांसाठी बसेसची व्यवस्था करण्यात येईल. त्याचबरोबर ये-जा करणे शक्य नसणाऱ्या कामगारांसाठी राहण्याची, जेवणाची व्यवस्था प्रशासनाकडून केली जाईल, असेही ते म्हणाले.

यावेळी कृषी उत्पन्न बाजार समिती आणि विविध संघटनांना येणाऱ्या अडीअडचणी जाणून घेऊन त्या बाबत योग्य ते मार्गदर्शनही डॉ.म्हैसेकर यांनी केले.

### ससूनची अकरा मजली इमारत कार्यान्वित होणार : डॉ. म्हैसेकर

**कोरोना विषाणूचा फैलाव आणि प्रादुर्भाव शहरात वाढत असल्याने अधिकाधिक रुग्णांना वैद्यकीय सेवा-सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ससून रुग्णालयातील नवीन अकरा मजली इमारत सोमवार (आज) पासून कार्यान्वित होत आहे, अशी माहिती विभागीय आयुक्त डॉ. म्हैसेकर यांनी दिली. या नवीन व्यवस्थेच्या व्यवस्थापनेची जबाबदारी पशुसंवर्धन आयुक्त सचिंद्र प्रसाद सिंह यांच्याकडे देण्यात आली आहे.**

Scanned with CamScanner

# कांद्यासाठी लवकरच स्पेशल हॉर्टिकल्चर रेल्वे

## आंतरराज्यीय शेतमालासाठी एकूण ५८ रेल्वे मार्गांवर १०९ पार्सल स्पेशल ट्रेनची सुविधा

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

केंद्र सरकारने कांदा पुरवठ्यासाठी देशात नाशिक ते दिल्ली-कोलकाता येथे कांदा पुरवठा करण्यासाठी स्पेशल हॉर्टिकल्चर ट्रेन सुरू करण्याबाबत कार्यवाही सुरू केली आहे. शेतकरी, व्यापाऱ्यांनी बुकिंग केल्यानंतर ही सुविधा कार्यान्वित होणार आहे. तसेच केंद्र सरकारने राज्यातील शेतमाल व अत्यावश्यक वस्तू देशामध्ये वाहतुकीसाठी एकूण ५८ रेल्वे मार्गावर १०९ पार्सल ट्रेनची सुविधाही नुकतीच सुरू केलेली असल्याची माहिती राज्य कृषी पणन मंडळाकडून देण्यात आलेली आहे.

देशात व राज्यात कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे लॉकडाऊन सुरू आहे. अशा स्थितीत हाताशी व काढणीस आलेल्या पिकाची विक्री करण्याचे आव्हान शेतकऱ्यांसमोर आहे. नुकत्याच झालेल्या केंद्रीय समितीच्या बैठकीमध्ये केंद्र सरकारच्या नॅशनल हॉर्टिकल्चर बोर्ड आणि कंटेनर कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या (कॉन्कॉर) यांच्या सहकार्याने देशात नाशिक ते दिल्ली-कोलकाता येथे कांदा पुरवठा करण्यासाठी स्पेशल हॉर्टिकल्चर ट्रेन सुरू करण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.



पुढारी अँकर

देशात उत्पादित होणाऱ्या एकूण कांद्याच्या उत्पादनापैकी ३५ टक्के कांदा उत्पादन महाराष्ट्रात होत आहे. त्यामुळे कांदा पुरवठादार राज्य म्हणून या उपक्रमात महाराष्ट्र सहभागी होईल. राज्याचे पणन मंत्री बाळासाहेब पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व सूचनांअन्वये काम सुरू आहे. विशेषत: उत्तरेकडील राज्ये पंजाब, दिल्ली, बिहार तसेच दक्षिण-पूर्वेकडील पश्चिम बंगालमधील कांद्याच्या खरेदीदारांना कांदा पुरवठा करण्यासंदर्भात राज्यातील शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि व्यापाऱ्यांची एकत्रित संकलित माहिती असलेली यादी महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या https://www.msamb.com या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

ज्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांना परराज्यात कांदा विक्री करावयाचा असेल, त्यांच्यासाठी सुमारे १ हजार ४०० टन क्षमता असलेल्या ४० बोगींचा स्वतंत्र रेक अथवा किमान ८ ते ९ बोगीसुद्धा कॉन्कॉरच्या माध्यमातून वाहतुकीसाठी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे नॅशनल हॉर्टीकल्चर बोर्डाचे कार्यकारी संचालक श्रीनिवास बांडला यांनी स्पष्ट केले आहे, तशी माहिती राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक व राज्याचे पणन संचालक सुनील पवार यांनी दिली.

### कोविड-१९ पार्सल स्पेशल ट्रेन्स...

पार्सल सुविधेमार्फत देशातील दिल्ली, मुंबई, सुरत, कोलकाता, चेन्नई, हैद्राबाद, बंगळूर, गुवाहाटी, लुधियाना, भोपाळ अशा महत्त्वाच्या शहरांपर्यंत रेल्वेद्वारे शेतीमाल वाहतूक होणार आहे. राज्यातील मनमाड, भुसावळ, नाशिक, नागपूर, गोंदिया, सेवाग्राम, अकोला, बडनेरा, जळगाव, पुणे, दौंड, सोलापूर, मुंबई, औरंगाबाद, मिरज, सातारा, नांदेड या शहरातून ही रेल्वे जाणार असल्याने त्या भागातील शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी गट, शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था, मोठे शेतकरी व व्यापारी इत्यादींचा शेतमाल, फळे, भाजीपाला, दूध व दुग्धजन्य पदार्थ इत्यादी परराज्यात पाठविण्यास मदत होणार आहे.

### सर्व माहिती वेबसाईटवर उपलब्ध

राज्यातील कांदा पुरवठाधारकांची यादी, पार्सल ट्रेनची यादी, त्यांचे वेळापत्रका याबाबतची लिंक, राज्यांतून जाणाऱ्या १७ पार्सल ट्रेन्सची सविस्तर माहिती, देशातील पणन मंडळाचे दूरध्वनी क्रमांक, रेल्वेतील अधिकाऱ्यांचे दूरध्वनी क्रमांक उपलब्ध मंडळाच्या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी पणन मंडळाशी संपर्क साधण्याचे आवाहन पवार यांनी केले आहे.

# भाजीपाला, दुधाच्या वाहतुकीसाठी रेल्वे

## सुनील पवार : परराज्यातही सेवा देणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : लॉकडाऊनच्या काळामध्ये देशाच्या कानाकोपऱ्यांत राज्यात पिकलेला शेतीमाल जावा, यासाठी विशेष रेल्वे सुविधा करण्यात आली आहे. कांद्यासह विविध शेतीमालाची विक्री परराज्यात करणे सहज शक्य होईल. त्यासाठी पणन विभाग संपूर्ण मदत करणार असल्याची माहिती कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक तथा पणन संचालक सुनील पवार यांनी केली आहे.

देशात कोरोनामुळे लॉकडाऊन करण्यात आले आहे. त्यामुळे सर्व बाजारपेठा बंद आहेत. शेतीमालासह अत्यावश्यक सुविधांना यातून वगळण्यात आले आहे. नुकत्याच झालेल्या केंद्रीय समितीच्या बैठकीत नॅशनल हॉर्टिकल्चर बोर्ड आणि कंटेनर कॉर्पोरेशान ऑफ इंडियाच्या वतीने नाशिक ते दिल्ली आणि कोलकाता येथे कांदा पुरवठ्यासाठी विशेष हॉर्टिकल्चर रेल्वे सोडण्यात येणार आहे. त्याचबरोबर राज्यातील शेतीमाल आणि इतर अत्यावश्यक वस्तूंच्या वाहतुकीसाठी ५८ रेल्वे मार्गांवर १०९ पार्सल ट्रेनची सुविधा सुरु करण्यात आली आहे.

देशातील कांद्याच्या एकूण उत्पादनापैकी तब्बल ३५ टक्के कांदा राज्यात उत्पादित होतो. पंजाब, माहिती राज्याच्या पणन मंडळाच्या संकेतस्थळार देण्यात आली आहे. कांदापुरवठ्यासाठी १४०० टन क्षमता असलेल्या ४० बोगींची स्वतंत्र सोय करण्यात आली आहे. तसेच, ८ ते ९ बोगी वाहतुकीसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

शेतीमालासाठी कोव्हिड-१९ पार्सल स्पेशल रेल्वे सुरु करण्यात आली आहे. देशातील ५८ रेल्वेमार्गांवर १०९ पार्सल ट्रेनची सुविधा सुरु केली आहे. फळे, भाजीपाला, दूध व दुग्धजन्य पदार्थ असा शेतीमाल परराज्यात पाठविण्यास त्यामुळे मदत होणार आहे. रेल्वे पार्सल अंतर्गत दिल्ली, मुंबई, सुरत, कोलकाता, चेन्नई, हैदराबाद, बेंगळुरु , गुवाहाटी, लुधियाना, भोपाळ अश महत्त्वाच्या शहरांपर्यंत रेल्वेद्वारे शेतीमाल वाहतूक करण्यात येईल. तसेच, राज्यातील मनमाड, भुसावळ, नाशिक, नागपूर, गोंदिया, सेवाग्राम, अकोला, बडनेर, जळगाव, पुणे, दौंड, सोलापूर, औरंगाबाद, मिरज, सातारा, नांदेड आणि पूर्णा या शहरांतूनही रेल्वे जाणार आहे.

राज्यातील शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या, शेतकरी गट, शेतकरी सहकारी संस्था आणि व्यापाऱ्यांनी या पार्सल सुविधेचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी रेल्वे विभागातील व्यवसाय व्यवस्थापक